

# मृगजळ

डॉ. अमुल पावसकर

' मृगजळ' या काव्यसंग्रहाचे सर्वाधिकारी कवी डॉ. अमुल पावसकर हे आहेत. 'डॉ. सौ कादंबरी पावसकर' यांनी ते प्रकाशित केले.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्या्चे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना हे ई पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

**डॉ. अमुल पावसकर**

स्वरूप हॉस्पिटल, सावंतवाडी, ९४२२०५४९९१

यांचे आभारी आहोत.


ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in




(द्वितीय काव्य संग्रह)

**मृगजळ**

तृतीय आवृत्ती (२०१९)

**✻ कवी**

**डॉ. अमुल पावसकर**

**स्वरूप हॉस्पिटल**

सावंतवाडी, सिंधुदुर्ग.

९४२२०५४९९१

**✻ प्रकाशक -**

**डॉ. सौ. कादंबरी अमुल पावसकर**

९४२३०५१५२५

**✻ मुद्रक -**

आकार कलर प्रिंटर्स

कुडाळ, ✆ : ०२३६२-२२२२११

**✻ मूल्य -**

रूपये ३५०/-

# मृगजळ

डॉ. अमुल पावसकर

# प्रस्तावना

आनंदाचे डोही...

पेशाने डॉक्टर पण वारशानं मिळालेली मात्र उशिरा लक्षात आलेली काव्याची जाणीव कवीला स्वस्थ बसू देत नाही. संवेदनशील मन आणि वैचारिक प्रगल्भता असल्यानं अमुल कवितेच्या रूपात व्यक्त होत असतो. निसर्गसंपन्न, हिरव्यागार वनश्रीनं नटलेल्या सावंतवाडीत राहत असल्यामुळं निसर्गाचे विविध आविष्कार त्याच्या कवितांमध्ये वाचायला मिळतात.. मग तो 'सूर्यास्त' असो (दिवसाचा वा आयुष्याचा) वा 'आंबोली', 'सांज,' 'पहिला पाऊस' सारख्या कविता असोत. 'पहाट' सारखी कविता कुसुमाग्रजांच्या 'स्वप्नाची समाप्ती' या कवितेची आठवण करून देते. उमंग सारख्या कवितेत निसर्गासोबत फुलणाऱ्या कविमनाचं दर्शन घडतं.

केवळ निसर्गच नव्हे तर वर्तमानातील सामाजिक व राजकीय स्थितीचं दर्शन घडवणाऱ्या कविता आणि त्यामुळं व्यथित झालेला कवीही पाहायला मिळतो. काही वेळा या सगळ्यावर आपण काहीच करू शकत नाही याचीही खंत कवी 'सामान्य', 'अगतिक' यासारख्या कवितातून प्रकट करतो. जुन्या-नव्या पिढीतील बदलती जीवनशैली, जीवनाकडं पाहण्याचा आधिभौतिक दृष्टिकोन यामुळं नात्यांची वीण उसवत चालली की काय या विचारानं कवी अस्वस्थ होतो. 'बदल' सारख्या कवितातून ह्याचं प्रत्यंतर येतं. अर्थात हे सगळं कालचक्रानुसार व जागतिकीकरणाच्या रेट्यानुसार घडत आहे व घडत राहणार अहे याची मनोमन जाणीव असली तरी त्या भावना व्यक्त केल्याशिवाय कवीला राहवत नाही.

शब्दांचं सामर्थ्य अपार असतं. तुकाराम महाराजांनी 'शब्द' हेच संतांघरचं धन आहे असं म्हटलं आहे. 'शब्दसामर्थ्य' सारख्या कवितातून त्याचं लख्ख प्रतिबिंब उमटतं. कवी आपल्या कवितातून सर्वमांगल्याची, सर्वांच्या कल्याणाची इच्छा प्रकट करतो. कोणी दुःखी, दरिद्री राहू नये असं त्याला वाटतं. तो ईश्वराकडे त्यासाठी 'तू दे', ' ऐक देवा' सारख्या कवितेतून प्रार्थना करतो. कवी आस्तिक आहे. ईश्वरकृपेवर त्याचा विश्वास आहे. 'मालवणी गणपती' वर लिहिल्याशिवाय त्याला राहवत नाही. 'मन आभाळाएवढं' असं बहिणाबाई म्हणून गेल्या आहेत. मनाची विविध रूपं 'दुधारी', 'मन' यासारख्या कवितातून कवी वर्णन करतो. 'झुंजूमुंजू' ही स्त्री-गीताच्या धर्तीवरची कविता आहे.

कवी कुटुंबवत्सल आहे. आई-वडील गुरु यांच्याबद्दल त्याला आदर

वाटतो. परदेशी भुर्रकन उडून जाणारी मुले स्थलांतरित पक्ष्यांप्रमाणं ठरावीक कालावधीसाठी घरट्यात परत येतात व पुन्हा  आपापल्या दिशेने निघून जातात. 'मुले', 'वात्सल्य' यासारख्या कविता अशा भावना व्यक्त करतात. पुढच्या पिढीशी जोडून घेणं महत्त्वाचं आहे ही भावना कवीनं 'त्यांना सांगायचंय' सारख्या कवितेतून स्पष्ट केली आहे. सहजीवनातील अत्युच्च आनंदाचं वर्णनंही कवी करतो. काही कवितात शृगार तर काहीत विरहाचं वर्णन आहे. झोपाळ्यावर त्याला जीवनाची लय सापडते. (झोपाळा). रंगगंधाच्या, नादांच्या लयीत कवी देहभान हरपतो. लताच्या गाण्याची मोहिनी इतरांप्रमाणं कवीलाही मंत्रमुग्ध करते.

कवीनं केलेल्या परदेशप्रवासाचं चित्रणही कवी आपल्या कवितेतून करतो. विमानातून काळ्या-पांढऱ्या ससशांनी व्यापलेलं आभाळ पाहून कवी सुखावतो. अटलांटिक थंडीचा अनुभव तो वाचकांना देतो. मंडालेचा तुरुंग पाहताना त्याला तेथील इतिहासाचं स्मरण होतं. रुक्ष दुबई आणि आल्हाददायक कोकण यांची तुलना कवी सहजपणं करतो. 'मँडरिनच्या मुली' या कवितेतून चिनी मुली त्यांची देहयष्टी, त्यांचे डोळे. त्यांच्या रीतभात या सगळ्याचं कवीनं दर्शन घडवलं आहे.

विशिष्ट वयात आयुष्याची चढण संपून उतरणीला लागल्यावर पुढे कधी एकट्यानं आयुष्य जगावं लागेल ही भीती कवीलाही अस्वस्थ करते. ही भीतीही त्याच्या कवितातून उमटलेली दिसते. अलीकडच्या काळात स्मृतिभ्रंशानं ग्रस्त झालेले रुग्ण घराघरातून दिसतात. एकेकाळी संपन्न जीवन जगलेले हे लोक आपण पाहिलेले असतात त्यांचा भूतकाळ आठवून कवीचं गलबलून गेलेलं मनही कवितेच्या रुपानं सहजपणं पुढं येतं.

जीवनाचा सर्वांगानी अनुभव घेणाऱ्या कवीला म्हणूनच समरसून त्या त्या विषयाला भिडता येतं. त्याच्या विचारात व भावनात सच्चेपणा आहे म्हणूनच त्या कविता वाचाव्याशा वाटतात. त्यात लय आहे. त्यातील चपखल शब्द कवितेची खुमारी अधिक वाढवतात.

ह्या काव्यसंग्रहाच्या निमित्तानं अमुलला पुढच्या काव्यप्रवासासाठी तसंच त्याच्या व्यावसायिक यशासाठी खूप खूप शुभेच्छा आणि अनेक शुभाशीर्वाद!

**- वासंती फडके,**

३, आनंदवन, साहित्य सहवास, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१

# अनुक्रमणिका


आनंद
स्पर्धा
मृत्यूचा सोहळा
स्वप्नभंग
प्रार्थना
स्वप्नविश्व
एकटेपणा
संगत
हरिहरी
प्रेम
प्रहर
बदल
बापु
नातं
आभास
अजीब जीवन
संकेत जगण्याचा
विश्व एकीकरण
सृष्टी
वास्तव
नाते
काहूर
सार्थक
स्फूर्ती
माळरान
सुख दुःख
अराजक
प्रारब्ध
मौन
मृगजळ
मनातल उन्ह
मी माझा
दुधारी
सजीव वर्तन
आठवण
सत्संग
झाकोळलेले आकाश
सूर्यास्त
एकटा
जोगिया
जोगिया
कलियुग
अमृतक्षण
वा रे मानवा
चाहूल
ओढ
झोपाळा
पहिला पाऊस
सूर्योदय
मुले
मोह
प्रतीक्षा
स्त्री
गंध वेगळा
ऐरण
ओढ कवितेची
सांज
मौन
गतस्मृती
दुरावा
अतृप्त
पराभव
नियती
स्मृती
अमृतवेल
आत्मपरीक्षण

निराशा
प्रतीक्षा
पौर्णिमा
वर्षाव
मन
अंतर्नाद
बंडखोरी
निसर्गभावना
निरर्थ
शिक्षण
संभ्रम
जय श्री राम
अभागी
मँडरीन मुली
पाऊस निराळा
मानवता
अपेक्षा
अभागी
देहविक्री
लता
आंबोली
हवासा
जगणे जगलो
बदल
उमंग
अगतिक
स्वप्नसुख
माझे गुरू
सागर
गोमांतक
सामान्य
पाऊस आला
आर्तता
वास्तव
वर्षाव
दारिद्र
पहाट
धुंद
मी माझा
संदिग्ध
अनुभव
पावसातले कोकण
अमृतसिंधु
वादळी पाऊस
दुभंग
तू दे
शब्दसामर्थ्य
तुला पाहतो
मन मुक्त झाले...
जिंकलो तरीही
वास्तव
बदल
झुंझूमुंजू
ऐक देवा
नभ दाटले
केपटाऊन वॉटरफ्रन्ट
केपटाऊन ते अक्विला सफारी
मंडेलांचा तुरूंग
कालचक्र
मालवण गणपती
शिक्षक दिन
मन विकारी
स्मृती
निराशा
आक्रोश
काव्य निर्मिती
वात्सल्य

दुबई बेलग्रेड विमानप्रवास
बेलग्रेड युवती
व्यथा
भोग
सरण
स्मृतीभंश
नवपिढी
दोघे
पैलतीर
प्रीत
मी माझे
जवान
लिलाव
त्यांना सांगायचंय
स्वप्नांचा इमला
दगाबाज
शुभ दीपावली
स्वरूपदर्शन
मैफिल
कोकणची राणी
धागे
कोश
कालचक्र
सांज
शब्द
ध्यास
विस्मृती
प्रतिमा
ओढ
प्रीत
संगत
त्याग
चराचर
माझी कविता
रहाटगाडे
जनता
आठवणी
संस्कार
आकांक्षा
'ती' ...आली
नटसम्राट
परतीची वाट
संभ्रम
माझा चंद्र
खोटे
दावा
काळोख
आलेख
क्रांती
खांदे
माता
गर्दी
मिलन
अश्रू
दैव
जागर
मृगजळ
रेशीमगाठी
प्राक्तन
चाहूल

# आनंद

नको .......
अति समृद्धीचे मनोरे
वेदनेचे जळजळीत निखारे
उफाळत्या भावनांचे किनारे
प्रसिद्धीचे लखलखते सितारे

पाहत ........
उमलते तेजाचे तारे
साथीला गार वारे
संगीतातले सूर न्यारे
निसर्गातले अदभूत नजारे

सुखाच्या लहरींवरी
प्रेमळ मित्रमैत्रिणिंसंगे
आनंदी जीवन फुलवू सारे

***

# स्पर्धा

स्पर्धेच्या अक्राळ विक्राळ
लाटांमध्ये बदलल्या
यशा -अपयशाच्या संकल्पना

रोजच्या रस्सीखेचीत
थिजल्या संवेदना
सरल्या भावना
गोठले करुणेचे आसू

पहिल्या -वहिल्या
नंबरसाठी
संपतो अंतरात्मा

वैषम्य नसे देता
अमानवी यातना
उरते उरात केवळ वेदना

***

# मृत्यूचा सोहळा

जन्मानंतर मृत्यू अटळ
त्यात कसले भय
सर्व सजीवांना लागू
हेच निसर्गनियमांचे बळ

मृत्यू हाच पूर्णविराम
नसतो पुनर्जन्म
नसतो स्वर्ग नरक
हे सारे कल्पनेतले खेळ

जन्मापासून मृत्यूपर्यंतच
जगण्यासाठीचा वेळ
त्यातच लिहावी सन्मानाची
कर्तृत्वाची जीवनकहाणी

मृत्यूनंतरच्या अंत्यविधी
हा तर असे पोरखेळ
केवळ व्रतवैकल्पांचा मेळ
मृत्यूपूर्वी प्रेम द्यावे सकळ

कसला मोक्ष, कसला आत्मा
निव्वळ अध्यात्मिक वल्गना
वार्धक्यात नको परावलंबित्व
तेच सदाचाराचे अंतिम फलत्व

वृद्धपणानंतर नैसर्गिक मृत्यूचा
नको दुःख विलाप वेगळा
नको काढू वियोगाचा गळा
करावा आनंदी सोहळा
जसा जन्मोत्सव आगळा

***

# स्वप्नभंग

आकाशात चांदण्यांची रात्र सरली
रुतलेल्या पावलांचे ठसे,
पूसत रात्र गेली

अलगद बनविले वाळूचे किल्ले
लाटेच्या एका भरतीत,
दिसेनासे झाले

वाऱ्याची जोरात झुळूक आली
काय होते आपले,
कळेनासे झाले

उरात भरले आभाळ चांदण्यांचे अमावास्येचा काळोखा चंद्र,
तोही दूर गेला

सुगंध येई कपड्यांस मोगऱ्याचा
विसरून गजरा फुलांचा,
स्वप्नात रात्र गेली

***

# प्रार्थना

नको स्वैर विचारांचे थैमान
करावे चित्ती एकरूपी ध्यान
केवळ शांत मनाचे परिधान
ओंकारातच ज्ञानाचे उगमस्थान

ना जाती –धर्म –शास्त्राचे बंधन
ना गरीब –श्रीमंतीचे अवधान
ना मंत्र– तंत्र –रीतींचे उच्चस्थान
असो मंदिर वा मस्जिद प्रार्थनास्थान
मनस्वी ध्यानच असे समाधान

नको ऐहिक सुखाची याचना
नको दुःखातच ईश्वरी आराधना
असावी सर्वकल्याणासाठी प्रार्थना

***

# स्वप्नविश्व

नसेल व्यथा वैरभाव
कशाला युद्धाचा अविर्भाव

नसेल काही झगडा तंटा
कशाला कोर्ट कचेऱ्यांचा झंझोटा

नसेल काही अपराध
कशाला पोलिसांचा खाक

नसेल काही दुःशासन
कशाला पाहिजे शासन

इतर सजीवांना
कुठे लागते शासन

नसेल दुःख निराशा अभिलाषा
सर्व आनंदाचीच भाषा

स्वप्नातल्या या विश्वात
नसे अनेक देश धर्म जात
असे सुखी एक मानवजात

***

# एकटेपणा

गजबजलेल्या संध्याकाळी
असतो मी एकटा

दाटून येती भावना
अवघडलेल्या मना

हुरहुर भासे मनी एकलेपणाची
भय वाटे गोंगाटातल्या निशःब्दपणाची

अश्रू देखील होती निरर्थक
जेव्हा पुसणारा नसे सार्थक

ओढ वाटे त्या सहजीवनाची
सुखदुःखाच्या सहचारिणीची

नको ती एकाकिपणातील शांती
पाहिजे दोन गप्पागोष्टींची संगती

***

# संगत

सत्संग असे सुविचारांचा संग
संत सहवासात होई मन दंग
प्राण –श्वासाचा निःसंग
निर्गुण विचारांचा व्यासंग

करी मनाचे उन्नतीकरण
काळोखातून प्रकाशाकडे प्रयाण
तमसो मां ज्योतिर्गमया!

कुसंग असे कुविचारांचा संग
अविचार दुर्गती चा पासंग
अशांत मनी अनाठायी वादंग
ऐहिक सुखातच राहती दंग

होते आत्म्याचे अवनीतीकरण
प्रकाशाकडून काळोखाकडे प्रयाण
ज्योतिर्म तमसो गमया!

***

# हरिहरी

घ्याल
आत्मविश्वासाची भरारी
मिळेल
सुखी जीवनाची सफारी

कराल
ज्ञानार्जनाची सवारी
तेव्हाच
बुद्धिवंतांची बरोबरी

असेल
नम्रता शरीरी
तरच
व्यक्तिमत्वाला उभारी

असेल
सौन्दर्यतेची जाणकारी
गवसेल
स्वप्नवत परी

केला
अपराध जरी
करावी
क्षमायाचना सत्वरी

करूया
प्रेमाची वारी
समस्तांपरी

नको
भरलेली तिजोरी
त्यातून येते
पैशाची मुजोरी

***

नको
शब्द दुधारी
अथवा
वृत्ती विखारी

शेवटी हरिहरी
हीच वस्थुस्थिती खरी

***

# प्रेम

प्रेमाच्या त्या
हृद्य आठवणीने
भावविश्व उमलते

भावुक चिंब मन
हलकेच विहरते
फुलपाखरासारखे

काळजातील धडधड
वेधते सूक्ष्म
अव्यक्त वेदना

हृदयातील हुरहूर
टिपते एखादा हळवा
पाणावलेला आसू

थरथरणारी काया
सांगते पूर्वाश्रमीची
अपुरी कहाणी

आयुष्याच्या उतरणीला
दाटते ही पूर्व संचिताची
अतृप्त बावरी विरागणी

***

# प्रहर

घड्याळातले काटे गाती
आयुष्याचे समयी गीत

प्रातःकाळी अनुभवा
निसर्गाचे सुमधुर तराणे
सायंकाळी धूसर संध्याछाया
हुरहूर भय ते केविलवाणे

माध्यान्हीचा तळपता सूर्य
देई प्रफुल्लतेचा तेजस्वी
उल्हसित मनीचा प्रकाश
रात्रीच्या प्रहरी चिरणारा
निर्जीव शांत गूढ काळोख

झटक्यात बदले प्रहर
जसा जीवनात येई कधी
सुखाचा बहर तर कधी
अतीव दुख्खाचा कहर

जीवनात गुंफतो
आडव्या उभ्या धाग्यांचे
द्वंद्व हे निराळे
कधी गुंफतो ,कधी उसवतो
वेधून मनीच्या समयीरेषा

***

# बदल

मानसिकतेत बदल
गतिमानतेत बदल

आचार विचारांत बदल
जीवनशैलीत बदल

स्वीकारा वा नाकारा
अनिवार्य आहे बदल

नको पाश्चिमात्य नक्कल
नको अंध अनुकरण

बदल पाहिजे शाश्वत संक्रमण
बदल पाहिजे क्रांतीचा पडघम

जाणिवांशी रुजवात साधतच
होतो मूलभूत आमूलाग्र बदल

***

# बापु

मेलो जरी कितीही
सत्यास राखितो मी

विषमतेच्या जगात
समानतेस जागतो मी

सहवेदना ज्याच्या ठायी
त्यास वैष्णव मानतो मी

भूतदया परोपकार
उपहार मानतो मी

वाढत्या हिंसेच्या जगात
अहिंसा पाळतो मी

राहणी असेल साधी
उच्च विचारांना ईश्वर मानतो मी

जगणे असता जगी
व्यर्थ चिंतन टाळतो मी

कोण म्हणे राष्ट्रपुरुष
सुज्ञ माणूस समजतो मी

मृत्यू असता समोर
'हे राम'म्हणतो मी

***

# नातं

यशाच्या शिखरावर उंच जाती
अपयशाच्या दरीत मागे उरती
कोणी ना कोणासाठी थांबती

श्रीमंतीत असतात नाती गोती
गरिबीत देऊन त्यांना मूठमाती
वाटते याच नात्यांची भीती

संपते धुंदीतली मस्ती
विसरते गाढ ती दोस्ती
उरते गालीब पुरती मैत्री

सागरासारखे जगावे
आपल्याच लहरींवर
धुंदीत गात जीवनगाणे

मिळाला तर
अतूट मैत्रीचा किनारा
नातेबंधनाचा निवारा
अन्यथा
शांत मनाचा सहारा

***

# आभास

नभी दाटला काळोख त्या ढगांचा
पत्ता नसे धुवाधार पावसाचा

वाटले होईल तृप्त वर्षावात
विरल्या साऱ्या वेदना मनात

भिजतील चिंब त्या गतस्मृती
संततधार ओघळणाऱ्या आसवात

विखुरल्या चांदण्यातल्या गुजगोष्टी
मंतरलेल्या धुंदलेल्या रात्री

एखादी यावी वीज लकाकत
चिरून सारा आंधळा अंधार

जगतो विराण आयुष्य धुंडाळत
वातड वाळवंटातले पुसट ठसे

कुठेतरी सापडेल एखादे ओॲसिस
यासाठीच जगण्याचा शुष्क आभास

***

# अजीब जीवन

कीती अजीब आहे जीवन

विकत घेऊन एक घड्याळ काय बांधले
काट्यांच्या दिनक्रमात,
अडकत मी गेलो

मनःशांतीसाठी घर काय बांधले
घरांच्या गरजांसाठी,
भटकत मी राहिलो

संध्याकाळ संपता संपत नाही
संपत चाललेलं,
आयुष्य कळत नाही

जिंकत गेलो तर आपले मागे राहतात
हरलो तर आपलेच,
आपल्याला मागे सांडतात

वाईटाने वाईट आणि बऱ्याने बर म्हटलं
जेव्हडी प्रत्येकाची गरज,
तेव्हढच मला ओळखलं

जळतात माझ्यावर दुश्मन
कारण माझ्याकडे आहेत,
तुमच्यासारखे मित्रजन

मला प्रसिद्धीचा हव्यास नाही
तुम्ही ओळखता एव्हडच,
मला पुरेसं आहे

नदीकडून शिकावं जगण्याचं गुपित
आपल्याच धुंदीत जगावं,
वाहत शांत प्रवाहात

***

# संकेत जगण्याचा

नको विसरू संकेत जगण्याचा
नक संकेत उगीच रडण्याचा

नको निव्वळ आशावाद
नको केवळ निराशावाद

असावी सुखाची आकांक्षा
नको राक्षसी महत्वाकांक्षा

दुसऱ्याकडून अपेक्षा करण्यापूर्वी
स्वतःशी प्रामाणिक राहावे

भरभरून ओजंळीत आपुल्या
कधीतरी देणारे हातही घ्यावे

नका बदलू दररोज सरडयाचे रंग
असावे एकरूपी स्वच्छ अंतरंग

घ्या शोध अध्यात्मिक शांतीचा
नको निव्वळ ऐहिक सुखप्राप्तीचा

जसे येईल तसे राहणे
हेच व्यावहारिक जगणे

***

# विश्व एकीकरण

विश्वाच्या एकीकरणाने
वाढतोय विसंवाद

आर्थिक स्पर्धात्मक युगात
श्रीमंत होतात शिरजोर

गरीब मात्र बनतात
नीराधार कमजोर

अणूसक्षम शक्तींचे युद्धसाहस
करतील पुऱ्या जगाचा ऱ्हास

दोन युद्धांमधील विराम
केवळ तात्कालिक शांतता

आत्मिक समाधानासाठी भ्रमंती
देईल खरी जागतिक शांती

असेल रचनात्मक सहजीवन
तेव्हाच होतील सारे पावन

नको व्यथा वादविवाद
पाहिजे आत्मनिर्भर संवाद

काय असावा प्रगतीचा संकेत
भौतिक उपलब्धीचा विपर्यास?

दुर्बलांचा उपहास कि
आत्मानंदी सर्वव्यापी परिहास!

***

# सृष्टी

पक्ष्यांचा किलबिलाट
पाण्याचा खळखळाट

पानापानातून चमके सूर्यप्रकाश
चांदण्या रात्री धुंदलेलं आकाश

फळा फुलांचा सुवास
दरवळे आसपास

सृष्टीचा हा विलास
सुखवी निर्गवी मनास

सर्व प्राणिमात्रांना
समानतेचा भास

साधू संत वसती जंगलात
असे निरव शांततेचा ध्यास

परमेश्वराला नको
देवळाचा आभास

निसर्गाच्या गाभाऱ्यातच
त्याचा निर्मळ रहिवास

जिथे चैतन्याचा श्वास
तिथेच ईश्वरी सहवास

***

# वास्तव

एक सकाळ होती
हसत हसत उठत होतो
आता संध्याकाळ संपते
हसणे कसले ते विसरतोच मी

मला माहित आहे
माझे काही मोल नाही
पण तुमच्यासारख्या
अनमोल नात्यांना जपतो मी

किती दूर गेलो मी
नातीगोती जपताना
आपल्यांना जपताना
स्वतःतल्या 'मी' लाच हरवलो मी

लोक समजतात
खूप हसतो मी
खरंतर स्वतःची दुःख
लपवता लपवता थकतो मी

असतो आनंदी कधीतरी
इतरांना सुखी ठेवतो मी
असलो जरी बेफिकीर
इतरांची फिकीर करतो मी

मातीत कधीतरी बसतो मी
कारण मला माझी औकात आवडते
असं नाही कि माझ्यात काही ऐब नाही
खरंतर माझ्यात काही फरेब नाही

जीवनाच्या भागदौडीत
विविध रंग बिखरतात
असामान्य माणसे देखील
सर्वसाधारण बनतात

***

# नाते

तुला न कळले मला न कळले
कसे संपले नाते अपुले

नाते होते शब्दांच्या पलीकडले
नसे रक्त बंधनात अडकलेले

विश्वासाच्या हिंदोळ्यावर
हेलकाव्यात नाते जपले

कितीही भांडलो, कितीही रडलो
ऋणानुबंध कधी ना हलले

आयुष्यातल्या सुखदुःखात
एकमेकांस जरी सांभाळले

वयाच्या उतरणीला
का बरे हे बंध उसवले

स्वप्नवत अपुल्या नात्याला
अहंकाराने का बरे वेढले

आज अचानक असे का झाले
हलक्या कानांनी वेध का घेतले

तुला न कळले मला न कळले
कसे संपले नाते आपुले

***

# काहूर

खोल रुतलेल्या वेदनेला
गोठलेले आसू दिसतील का

बरसत्या धारांना काळवंडलेलं
आभाळ पेलवेल का

अतृप्त रुद्र लाटांना
ओला किनारा सापडेल का

हेलकावणाऱ्या नावेला
सागराचा तळ कधी कळेल का

हृदयातल्या मुक्या रडण्याला
चेहऱ्यावरचे हासू पाहवेल का

मनातल्या या द्वंदाला
मोकळे होता येईल का

अंतरीच्या अपूर्त स्वप्नांना
दुभंगलेली धरती सामावेल का

मुखवट्यांचे हे जगणे जगता
काहूर वेड्या भावनांचे मिटेल का?

***

# सार्थक

केसातून प्रेमाने हात
फिरवणार कोणी नसेल
तर झुल्फेदार केस व्यर्थ आहे

शरीराच्या कमनीयतेला
वाखणणार कोणी नसेल
तर शरीरसौष्ठव व्यर्थ आहे

गाण्यातल्या सुराला
दाद देणार कोणी नसेल
तर तान घेणे व्यर्थ आहे

कवितेतल्या भावार्थाला
समजणार कोणी नसेल
तर काव्यरचना व्यर्थ आहे

मृत्यूनंतर जर
कोणी रडणार नसेल
तर जगणे व्यर्थ आहे

आपल्या जाण्यानंतर
आपले चांगले नाव राहणे
हेच जीवनाचे सार्थक आहे

***

# स्फूर्ती

भावनेच्या आवेगात
उलगडते अंतरंग

कोण म्हणे कविता
कोण म्हणे गाणे

कोण म्हणे वृत्तछंद
कोण म्हणे मुक्तछंद

शब्द असती
एक माध्यम

कधी चपखल
कधी केविलवाणे

कधी सुमार
कधी बेसुमार

शब्दांपलीकडल्या
निशब्द जागातच

असतो
जगण्याचा अविर्भाव

त्यातल्या भावनातला अर्थ
असतो खरा काव्यार्थ

***

# माळरान

प्रेमाच्या माळरानावर
आनंदाची रंगीबेरंगी फुले

मन मोकळ्या वाऱ्यासंगे
सुगंध आसमंती दरवळे

मैत्रीच्या सहवासत
उडती पाखरांचे थवे

नसे पर्वा वादळ वाऱ्याची
अथवा थंडी पावसाची

आभाळाला पांघरून
स्वत्व धरतीमातेला बिलगे

नाही चिंता उद्याची
वा कोमेजण्याची

नाही वृत्ती संचयाची
असेल नशिबी रोज मिळे

निसर्गाची ही शिकवण असता
कशाला मूल्यशिक्षणाचे धडे

***

# सुख दुःख

नका जल्लोष सुखापरी
नको नैराश्य दुःखातीरी

मनमोकळेपणे हसा सुखात
उन्मुक्तपणे रडा दुःखात

दुःख असती धरतीवरी
म्हणून सुखाला व्याख्या खरी

सुखात येती उथळ विचार
दुःख प्रगल्भतेचा साक्षीदार

सुखाचा पाठलाग करती
तेच जास्त दुःख भोगती

समानतेने सुखदुःखाचा स्वीकार
हाच परिपूर्ण जीवनाचा साक्षात्कार

***

# अराजक

रत्ने असता भोवती
रत्नपारखी नसे सभोवती

दुर्गुणांच्या मांदियाळीत
सद्‌गुणांना कोण पुसती

सुविचारांचा सहवास
अविचारात हरवती

अहंकार इर्षेच्या वास्तवास
शालीन नम्रतेचा नसे ध्यास

सत्तेच्या राजकारणात
संवेदनशीलतेचा आभास

अराजकतेच्या आगडोंबात
होरपळे विश्वरूपी परिहास

कलियुगातील या स्थित्यतरास
बदलती सुसंस्कारच सर्वांस

***

# प्रारब्ध

विचार असता तोकडे
दोष सारे नशीबाकडे

कष्टाचे असे वावडे
पडती सारे फासे उपडे

धाव घेती इकडे तिकडे
घालाया देवाकडे साकडे

कितीही देवाचे बडबडे
पण पदरात काही न पडे

कोणी नसती मनकवडे
कर्म योजती भविष्यातले पाढे

भेटती अनेक बोलघेवडे
गरजेस नस्ती कोणी तीकडे

आयुष्याचे निघती धिंडवडे
कारण म्हणे प्रारब्धच वाकडे

***

# मौन

असेच तुझ्याशी ठरवून आलो
बोलायचे म्हणून मनाशी
तसेच काही जवळून पहिले
तुझ्या डोळ्यातील भावनांशी

वरवर हसता विसरून गेलो
काय ठरविले बोलायचे तुझ्याशी
तुही हरली मीही हरलो
गप्पागोष्टींच्या नादाशी

डोळ्यातील जाणीव विरली
अंतरीची वेदना सरली
भिडली उथळ नर्म संवेदना
विसरलो काय ठरवले मघाशी

एक आवंढा गिळून तुही
रचविले ते बंद ओठी
दाबून ओठ ते उठविली
कपाळावर हलकीच आठी

त्या आठीचा छेद घेतला
नशिबातल्या त्या घडीने
तू झालीस मुकी अचानक
मीहि घेतले मौन अशाने

जन्मातली या संपली भाषा
फुटेल वाचा पुढील जन्मा
जगता जगता नको निराशा
मरताना जागवू नवचैत्यनाची आशा

***

# मृगजळ

मृगजळात मी भरली घागर
रेताड विश्वात मनीच्या
रिक्त झाली माझी ओंजळ

मृगजळात मी न्हालो भिजलो
मृगजळ मी सांडत प्यालो
तृष्णा माझी कशी सरली

मृगजळाच्या लहरीवरी
उगीचच मी सुखावलो
तप्त उन्हात मी कोमेजलो

मृगजळात मी भरली घागर
संपला तो रिता उष्ण प्रहर
येईल नवजीवनाचा बहर

***

# मनातले उन्ह

मनातल्या उन्हात
चेतावल्या भावना

ढासळल्या कोरड्या
रित्या संकल्पना

पावसातल्या धारांत
ओसंडल्या संवेदना

दाटल्या या जन्मीच्या
फुंकलेल्या वेदना

पारावरच्या बनात
ओशाळल्या प्रेमभावना

नसे थोपवणारा किनारा
ओघळणाऱ्या आसवांना

सुस्त शांत पाण्यात
तरंग चंद्रफुलांना

तोच चंद्र तोच वारा
तसेच असती तास बारा

फक्त संपला संवाद सारा
उरे केवळ यातनांचा पसारा

***

# मी माझा

आसवांनी मी मला भिजवू कशाला
गोठलेल्या भावनांना मी रुजवू कशाला

संतप्त मनाचे गीत हे विराणे
तप्त त्याच्या तानेला मी गोंजारु कशाला

शब्द असतील रिते केविलवाणे
त्यातल्या भावार्थाला मी उमजू कशाला

मी झोपतो घेऊन दगड उशाला
चंदेरी चांदण्यात मी रिझवू कशाला

असता मराठमोळा माझा बाणा
सत्ताधाऱ्यांचे उंबरे मी झिजवू कशाला

पहाटवेळी प्रतिभा अंतरीला
जागणाऱ्या शब्दांना मी निजवु कशाला

मी नाही पूर्णत्वाचा पुतळा
कमजोरपणाला मी खिजवू कशाला

जगण्याचा असता आगळा सोहळा
अकाली मरणाला मी स्वीकारू कशाला

***

# दुधारी

कसे मनाला झुलवत जावे
असे उपजत कला तुला ती

कसे कुणाला फुलवावे
कशी करावी क्षणात माती

क्षणात द्यावे भरून करांनी
क्षणात घ्यावे सारे ओरबडुनी

कसे बोलावे शब्द दुधारी
कसे दुखवावे परकेपणी

कशी स्निग्धता आणून नेत्री
असा लाघवीपणा तो ओठी

तुझ्या कलेत तुजला तृप्ती
कशाला ही दूधारी आत्मकेंद्री व्रुत्ती

***

# सजीव वर्तन

पाहिजे शिवले;
फाटके जीवन
निसर्गातल्या निखळ आनंदाने

पाहिजे धुतले;
बरबटलेले कपडे
अखंड हसऱ्या कष्टाच्या घामाने

पाहिजे सोडविला;
भ्रमाचा गुंता
साध्या सोप्या निर्मळ संवादाने

पाहिजे विसराया;
यशाचा उन्माद
कधीतरी अपयशाच्या आठवणीने

असेच आपुले;
बहुरूपी जीवन
फुलवावे सजीव वर्तनाने

***

# आठवण

भावाकुल नजर तुझी
ओथंबलेले शब्द तुझे

नजर पडे आसमंती
आठवती भाव तुझे

कललेले माड भवती
तुटलेले डोंगरकडे

निळ्या निरभ्र नभाला
भिडणारे शुभ्र कडे

फेसाळणाऱ्या लाटांमध्ये
कलणारी नाव पुढे

वाळूतल्या शिल्पांची
पुसत जाणारी पाऊले

शांत निजलेल्या पाण्यावर
उमलली कृष्णवर्णीय कमळे

गगनावरी झेपावती
पांढरे बगळ्यांचे थवे

दाटते सल मनी
विरहाचे साकडे

आठवती राहुनी मला
अजूनी जखम ना बुजे

***

# सत्संग

नको पारिवारिक नाळ
नको वैऱ्याग्याचा मेळ

नको संसाराचा पोरखेळ
नको जातिधर्माचा खेळ

नको दिनभर सत्संग
नको अवघे प्रपंचात मग्न

कधीतरी चंद्रभागेतीरी दंग
गात वैष्णवांच्या संग

असे सय्यमाचे जिणे
असावे मानवाचे राहणे

काम क्रोध मत्सराचे
विसरून सारे भान

सत्य अहिंसा सहवेदना
देती जगण्याचा सन्मान

***

# झाकोळलेले आकाश

आभाळ झाकोळले
झाकोळला तो सूर्य

कडाडले गडद आकाश
चमकला विजेचा प्रकाश

बरसल्या घामाच्या धारा
कुठे मिळेना थंड गारवा

रखरखली तप्त पाती
तडतडली शुष्क धरती

चांदणे नाही साक्षीला
चंद्रप्रकाश उतरणीला

पक्षांनाही कळेना अवकाळी
पावसाचे आगमन का आले

चार उडाले शिंतोडे
मोर अकाली नाचले

उद्याच्या पावसाची आशा
विझवेल आजची निराशा

***

# सूर्यास्त

सूर्यास्ताच्या अदभूत क्षणी
संध्याराग गगनाच्या अंगणी

पसरला रक्तिमा तो नभी
तरंग बदलत्या लाटांवरी

तुटले पैंजण रुणझुणी
विखुरले नक्षत्रंचे मणी

सूर उमटती गोजिरवाणे
अव्यक्त अवकाशातुनि

संथ वाहती गार वारा
सुखवती संध्याछाया

निशा वाटती भयप्रद माया
गंभीर स्तब्ध तीची काया

नसतो कधी शाश्वत अस्त
आल्हाददायी प्रभात निश्चित

मलमली पहाट उमलते घेऊन
प्राजक्ताचा सडा पुन्हा अंगणी

***

# एकटा

नदीतल्या त्या पाषाणावर
चिवचिव करितो एक चिमणा

भुलून त्याच्या आर्जवावर
येती एक प्रणयोत्सुक चिमणी

गुलुगुलु करिती एकसाथीने
उडती जोडीने फुला पानांवर

कोसे स्वतःला दूरवर वेगळा
स्तब्ध निशब्द एक बगळा

पाहता या युगुलाचे गुंजन
प्रेमभाव दाटती त्याच्या मनी

अलिप्तपणाचा भाव आणीत
स्वतः राही मात्र नामानिराळा

गहिवरे स्वतःच्या एकटेपणात
न्याहाळीत एकले रूप पाण्यात

ब्रह्मचर्याचे अवसान मनाशी
संत म्हणे मी बिचारा स्वतःशी

***

# जोगिया

निघालो तुला शोधायला
एका शांत क्लांत सायंकाळी

विसरून गतकाळातील
दाटलेली गूढ काजळी

रस्ते सारे निर्मनुष्य सुनेसुने
कोंडणारा अंधार गडद तळी

मिणमिणते अबोल पथदीप दर्शती
अतृप्त विराण आयुष्यातील पळी

दारोदारी मारिल्या आर्त हाका
पडसाद नसे कुठल्याच स्थळी

नसे सापडल्या दाहीदिशा
पाऊलखुणा रुतलेल्या भूतकाळी

निराश जाहले मन उदासी
परतलो त्या शून्य काळी

जगणे केवळ रिक्त बहाणे
धुंडाळत गतस्मृतींची ओंजळी

***

# कलियुग

संपतोय सय्यम सुसंवादातला
अहंकार वाढलाय जीवनातला

नाही आदर जेष्ठ श्रेष्ठांचा
नाही आदर उच्च विचारांचा

वाढली तोंडी उर्मट भाषा
शब्दसंस्कारांची दुर्दशा

कमजोर झालीय सहिष्णुता
उद्दामपणाने वाढलाय तंटा

वाढलीय पैश्याची मुजोरी
निव्वळ सत्ताधीशांची शिरजोरी

ऐहिक सुखातच रमले सारे
सुसंस्कार विसरले हरप्रकारे

कुठे गेला महिलांचा सन्मान
केवळ आत्मप्रौढीचे उरले भान

पाहावे तिथे आकड्यांचा दावा
जीवघेण्या स्पर्धेचा कांगावा

निर्व्यसनी असतो बुळा भाबडा
व्यसनाधीनता ऐश्वर्याचा आखाडा

ही कसली पाश्चिमात्य प्रगती
ही तर मानवतेची अधोगती

***

# अमृतक्षण

आज आठवे मला तो दिवस
ओंजळीतल्या अमृतक्षणांचा

रक्तिमा तुझ्या लज्जित गाली
अजून ताजी ओठांवरची लाली
शृंगारात लाजली, नवबावरी मोहरली

नाही सुकली मेहंदीची जाळी
बावरलेल्या नेत्रात ती झळाळी
पिंजर ओली अद्याप तिच्या भाळी

आतुरल्या त्या मृदूभावना
सहवासाच्या गोड संकल्पना
बंधनमुक्त होती साऱ्या संवेदना

घेऊनि दूध थरथरत्या हाती
विश्वासाने, करण्या स्वप्नपूर्ती
अर्पिले सर्वस्व माझ्या वरती

संकल्प केला आनंदी जगण्याचा
मांडला आलेख सुखदुःखांचा
करू पाठलाग त्या स्वप्नरेखांचा

आज आठवे मला तो दिवस
ओंजळीतल्या अमृतक्षणांचा

***

# वा रे मानवा

किती विचित्र आहे माणसाची रीत .....
सुखाच्या वरातीत लोक नटून पुढे नाचतात
दुःखाच्या घडीला मयताच्या मागे चालतात

किती विचित्र आहे माणसाची रीत .....
जन्मभर खिळा भार सोसतो
स्तुती मात्र तस्विरीची करतात

किती विचित्र आहे माणसाची रीत .....
मृत्यूनंतर मेणबत्ती पेटवतात
वाढदिवसाला मात्र त्या विझवतात

किती विचित्र आहे माणसाची रीत .....
प्रेताला शिवल्यावर अंघोळ करतात
मांसाहार करून हात कागदाला पुसतात

किती विचित्र आहे माणसाची रीत .....
गीता आणि कुराण कधी लढत नाही
धर्मांध लढणारे कधी ते वाचत नाही

किती विचित्र आहे माणसाची रीत .....
स्पष्ट खारट मिठात किडे पडत नाही
लाघवी मिठाई जास्त टिकत नाही

किती विचित्र आहे माणसाची रीत .....
दूध विकायची भटकंती आटपत नाही
दारूसाठी रांग रात्रभर संपत नाही

किती विचित्र आहे माणसाची रीत .....
पायातल्या पैंजणावर हजारो उधळतात
सौभाग्याची बिंदी एक रुपयात भागवतात
वा रे मानवा !!वा रे मानावा !!!

***

# चाहूल

पावसाची चाहूल लागली
तापलेल्या उन्हात

तुझे नी माझे लग्न लागले
विसावलेल्या मनात

टपोऱ्या त्या थेंबांनी अक्षता
टाकल्या रानावनात

कडाडत्या वीजांनी वाजविले
सनई चौघडे तानांत

सुरंगीचा मृदगंध
दरवळे आसमंतात

स्वप्नांच्या गहिवरात
न कळे कोण हरवले कोणात

***

# ओढ

बसलो शिवारात एकटा विचारात
न्याहाळत चांदणे काळोख्या आभाळात

कलल्या चंदेरी सावल्या झाडापानांत
चंद्र बुडाला लखलखत्या रुपेरी पाण्यात

दाटली स्निग्धता आसुसलेल्या मनात
आसूही सुकले जडावलेल्या पापण्यात

रोडावली गलीत गात्रे, मंदावले श्वास
संपला विसावा ,उरे जीवनाचा आभास

आस त्या गूढ अनोळख्या प्रीतीची
अंधारत चाललेल्या एकांतात

उरात भरलेल्या त्या उसास्यांना
अतृप्त एकटेपणाचा आघात

***

# झोपाळा

झुलणारा माझ्या अंगणी झोपाळा
तिथेच लागला मला शब्दांचा लळा

नको शाई नको कागद नको लाकडी फळा
जाणिवांच्या रुजवतींना उमलतीशब्दकळा

पसरती माथ्यावर चंद्रकळा
जागवी अध्यात्मिक आनंद आगळा

कधी मार्मिक व्यक्तिचित्रणांच्या चित्रकळा
कधी मनातील भावनांचा कळवळा

गुंजती सूर कानी, आर्जवी त्या गळा
उमटती मनी वेदनेच्या आर्त कळा

निसर्गातल्या ऋतुचक्रांचा लडिवाळा
पुकारती नभी शुभ्र बगळ्यांच्या माळा

वाचता काव्यरचना, प्रेरणेचा स्त्रोत्र वेगळा
कधी कधी जाणवे प्रतिभेची अवकळा

झुलणारा माझ्या अंगणी झोपाळा
पहाटे येती कवितेच्या प्रसूतिकळा

***

# पहिला पाऊस

गडदले आकाश
पक्षांचा कयास

पहिला पाऊस
मातीचा सुवास

गहिवरला श्वास
बरसे मोत्यांची रास

तापलेल्या धरतीस
थंडावा खास

पाण्यासाठी प्रयास
संपला जीवास

झाडापानांचा सुहास
सुखवी मनास

सुखावले मन उदास
होता वर्षावाचा सहवास

***

# सूर्योदय

रुपेरी अभ्रांवर बैसोनि
सूर्य नभीचा डोकावती
जलाशयात आरसपानी
रक्तिमा पसरती धरतीवरी

बहरली ती वनदेवता
हिरव्या गार पानोपानी
वळणे घेत घेत जलपरी
चालली आपल्याच धुंदीतूनी

पक्षांचा किलबिलाट अंबरात
गार वाऱ्याचा उमंग तनामनात
सळसळत्या पानांचे सूर गाती
निसर्गाचे अदभूत सौन्दर्य गीत

आनंदाचा सोहळा घडती
नित्य या निसर्गातुनी
भूपाळीचे सूर उमटती
प्रभाती प्रसन्न मन मनातुनी

***

# मुले

मुले येति सुट्टीत घरा
घरभर करती पसारा
तरी तोचि दिवाळी दसरा

नवनवीन क्षेत्रात घेता उडी
घराबाहेर पडली पुढची पिढी
विस्कटली चिमुकली घरटी उघडी

रिक्त भासती घरे केविलवाणी
जरी असली ऐश्वर्याची निशाणी
घराघरातील ही रोजची कहाणी

रेटण्यास एकटेपणाचे गाडे
उपसती दररोज कामाचे रगाडे
लोकांस वाटे, पैशांमागे धडपडे

अविर्भाव एकांताचा बळेबळे
खरतर, वाट पाहती आर्त डळे
सतत त्यांच्या आगमनाचे डोहाळे

***

# मोह

नको पाण्या जाऊ ग, सांज त्या वेळी
डळमळेल पाय ग कासव तळी

भिजले शरीर चिंब, कटी ग ओली
घडा भरलेला अन हिरवी ग चोळी

गार वारा अन धुंद ती चंद्रकळी
सखा वाट पाही ग त्या पाणथळी

औट घटकेचा मोह ग टाळी
गळ्यात तुझ्या ग सौभाग्य लळी

नको वाकडी वाट कातरवेळी
परतीला तुझा ग घडा सांभाळी

घरी परत ये ग उजाड वेळी
नको मोहाचा ग शिक्का कपाळी

आसवे ढाळील कुंकू ग भाळी
उगीचच नको ग स्वप्नांची होळी

***

# प्रतीक्षा

जाशील दुरदेशा माझ्या सख्या
विसरशील का तू मला जिवलगा

विहरत विहंग अंबरात तिथल्या
दृष्टी आडची सृष्टी धूसर होईल का

तारुण्यसुलभतेला सांभाळशील नक्की
चंचल मनाला आवरशील का

लोचनांतील आतुरता आठवेल तुला
प्रतीक्षा सहवासाची कधी संपेल का

रंगवलेल्या स्वप्नांना जागशील तू
आर्त वचनांची शपथ जपशिल का

जाशील दुरदेशा माझ्या सख्या
विसरशील का तू मला जिवलगा

***

# स्त्री

माप ओलांडुनी आली
नवं बावरी ती लाजरी

जमीन तिची, चूल तिची
अंगण तिचे, मुलं तिची

छप्पर तिचे, भिंत तिची
कुंपण घरचे सांभाळले

लहान मोठ्या छीद्रास
वात्सल्याने झाकले

वात जळाली, ज्योत पेटली
अंधार क्षण तिने प्रकाशले

मुलगी असता सून झाले
आई असता सासू झाले

आता म्हणते पुरे झाले
शोधते आत्म्या दबलेला

घेईन मोकळा श्वास माझा
एकुलत्या या जन्मातला

जोडीत तुकडे कर्तृत्वाचे
अबोध त्या आत्मशोधाचे

समृद्ध करीन माझे जीवन
केवळ घरातच झाकोळलेले

***

# गंध वेगळा

एक माती एक आकाश
एक पाणी एक वारा

फुलाफुलांचे रंग वेगळे
कोण बनात कोण रानात

कोमेजलेल्या त्या फुलांची
सकाळ कधी होईल का

शापित त्या कळ्यांना
रोजचे फुलणे मानवेल का

बंधित त्या रंगांना संगे
स्वैर वारा उधळील का

गंध वेगळा त्या फुलांचा
मला कधी उमजेल का

***

# ऐरण

दुःख भावना पचवून साऱ्या
करेल आक्रन्दन .....हृदयाचे ऐरण

सुखाच्या त्या सुवर्ण क्षणांनी
करेल नर्तन .....हृदयाचे ऐरण

निराश होता प्रेम वियोग
करेल रुदन ......हृदयाचे ऐरण

स्पर्श होता त्या भक्तिरसाचा
करेल स्तवन .........हृदयाचे ऐरण

भावनांचे घाव सोसता
उडतील तेजःकण ........हृदयाचे ऐरण

अर्पिन त्यांची काव्यमाला जात
रसिकांना शरण .........हृदयाचे ऐरण

***

# ओढ कवितेची

ओढ शब्दातली, सुरांतली
गाण्यातल्या तानांतली

ओढ झऱ्यातली, ओढ्यातली
यमुनेच्या डोहातली

ओढ पानातली, फुलांतली
कोकिळेच्या गाण्यातली

ओढ मनातली, माणसातली
सरणावरच्या जळण्यातली

ओढ व्रतवैकल्पातली, ओंकारातली
ज्ञानेश्वरीच्या ओव्यातली

ओढ वळणातली, डोंगरातली
गडगडणाऱ्या वादळातली

ओढ दाण्यातली, घरट्यातली
भरारणाऱ्या चिमुकल्यांतली

ओढ वात्सल्यातली, क्रोधातली
मुग्ध धुंद शृंगारातली

ओढ शब्दांपलीकडल्या कल्पनेतली
पाझरणाऱ्या कवितेतली

***

# सांज

हंबरणाऱ्या वासरांची
सांज व्याकुळली

झिजणाऱ्या माऊलींची
आचळे ओथंबली

पेंगुळलेल्या छकुल्यांची
सांज कुशीत विसावली

धूंद तुझ्या डोळ्यातील
सांज स्वैर झाली

ओझरत्या चंद्रमाने
नवनिता मोहरली

दूर जात सावल्यांची
सांज वैर झाली

गडद येता काळोखाची
पाऊले अडखळली

दिवेलागणीच्या कातरवेळी
सांज अगतीक झाली

***

# मौन

तुझ्या ओठावरची लाली
माझ्या ओठावर रंगली ग

अन मनाच्या गाभाऱ्यातून
गंध मोगऱ्याचा दरवळला ग

आज स्वर्ग सुखाची लाट मनी
उसळून उसळून फुटली ग

नकळत अलगत आज सखे
गाठ जीवाची सुटली ग

सहवेदनेच्या या सुवर्ण क्षणाला
तुझे मौन माझ्या मौनात लपले ग

भंगलेल्या त्या अधीर स्वप्नांना
सुखाची मधुर पहाट सापडली ग

***

# गतस्मृती

या समृद्धी पलीकडे माझे एक गाव होते
मला आठवेना तेव्हा माझे काय नाव होते

एकाच रक्ताचे वेगवेगळे तेव्हा भाव होते
आपल्यांनीच आपल्यावर केलेले घाव होते

मुक भावनांचे सूर तेव्हा म्याव होते
उरातील जखमांवर वेदनेचे घाव होते

स्वप्न पहावयाचे देखील निराळे भाव होते
आता असतील साधू, तेव्हा मात्र साव होते

मला आठवेंना तेव्हा माझे काय नाव होते
घेतलेले श्वास सुद्धा हरलेले डाव होते

***

# दुरावा

अवखळ तुझी काया माया
रोज धाडू का तुला सांगावा?

शुभ्रपानी तू प्राजक्ताचा सडा
हसरा चंद्रमा तुझा पाहावा

संपता मधुर सहवास तुझा
डोळे लागे तुझ्या परतावा

मन होते दिग्मूढ उदास
आनंदाचा कितीही कांगावा

आठवण येता सांजसकाळी
येत ओठंडोळ्यांना ओलावा

कसे विसरू तुला सखे
नको हा जीवघेणा दुरावा

***

# अतृप्त

फिरलो विश्व जरी
गेली ना उदासी

लागले ना हाताला
काही अविनाशी

जरी वाटे ज्ञान मिळाले
शहाणपण कळले नाही

वाटे तो जड मिळाला
तळ कळला नाही

क्षितिज ते आनंदाचे
दिसते रे दूर काही

घेऊन मी चालू कसा
ओझे हे थकलेल्या बाही

***

# पराभव

चांदणी धुंद रात्र फिरण्यासाठी
तूच नाही आता हात धरण्यासाठी

फिकटलेले शुष्क ओठ तुझे
आसुसले उष्ण रंग भरण्यासाठी

लाडावल्या बटा तुझ्या
मुक्तहस्ते गोंजारण्यासाठी

उभी ठाकली भिंत मनाची
दार नव्हतेच शिरण्यासाठी

जुने घाव हे कशाला मोजू
पुरा जन्म हा झुरण्यासाठी

पराभवाची आग जळाली
मनोमनी जिवंत मरण्यासाठी

***

# नियती

मातीचे घर ते कसले
कणाकणाने ढासळले
भिंती तुटल्या
छतही पडले
पेटला वणवा
उफाळला सागर
फुटल्या लाटा
काळोख दाटला
दीप उलगले

तुझ्याच जन्मी
तूच विझवले
बिघडले सारे
गणित सगळे
काय खरे
काय खोटे
सापेक्ष भावातच
सारे गुंतले

गुरफटले केवळ
आयुष्यात आपापल्या
छेद देत त्याला
आनंदाचे क्षण
कधी गोंजारले
बरे तेव्हडेच
आपले म्हटले

कधी न कळले
नियतीचे हे खेळ

***

# स्मृती

आता नसे जवळ अथवा दूर
नयनात दाटे आसवांचा पूर

केवळ आता तुझ्या स्वप्नात चूर
आठवणीत तुझ्या भरून येतो उर

भैरवीत रमले चांदणे भरपूर
आता कुठे मिसळू सुरात सूर

सरले सारे भले आणि गैर
कसले युगायुगाचे वैर

उधळले गंध मनीचे अनावर स्वैर
आता नाही जवळ अथवा दूर

***

# अमृतवेल

सुवासात उमलले रात्रीचे फुल
जसे झोपेत हसते निष्पाप मूल

घेऊन स्वप्नसुरांची रंजनवेल
उमटे अलगद सुगंधी पाऊल

अंगणी फुलली चांदणवेल
गगनात झेपावती पक्षांचे झेल

नभातून चंद्र सुखावेल
पाहता निसर्गाची अमृतवेल

***

# आत्मपरीक्षण

वळून पाहता मागे मजला
आजचेच जगणे पसंत

मिळेल का याजन्मी
आत्मपरीक्षणास उसंत

कधीतरी भावतो अशरीर वसंत
शहारून जातो हृदयातील रसवंत

केवळ होण्यापेक्षा श्रीमंत
स्वीकारले होणे गुणवंत

नसती फार मला
खेद वा त्याची खंत

हेच सूत्र सांगून गेले सारे संत
समाधान साधण्या भजले भगवंत

***

# निराशा

निराशा ही अचानक मनाला
कोठून येति मला कळेना

कोंडलेले ते दुख्ख कधीचे
ह्रदयालाही कसे उमजेना

वरवर भासे हर्ष आनंदाचे
स्वप्न की सत्य समजेना

सुख आले ओसंडून जरी
शब्दातून काही ते पाझरेना

संपत आले आयुष्य तरी
वेदनेचे व्रत कधी मालवेना

सूर्यास्ताच्या उंबरठ्यावर
मनाची गाठ काही उकलेना

***

# प्रतीक्षा

उष्म्याचा चढला ग पारा
कधी येती ग पावसाच्या धारा

सोसाट्याचा सुटला ग वारा
धुळीचे लोट येति ग दारा

आसुसले मन वर्षावाच्या शृंगारा
कधी वेचुया ग अंगणी गारा

तहानलेल्या जीवास ग सहारा
गुराढोरास कधी मिळे ग चारा

पाण्याविना सुकले घरसंसारा
कधी येतील ग पावसाच्या धारा

***

# पौर्णिमा

पौर्णिमेचा चंद्र उभरे आकाशात निळ्या
गोड स्मृतींच्या ज्योती पाजळल्या सगळ्या

फुलल्या लाख स्पर्शसुगंधाच्या कळ्या
मनी नाचू लागल्या स्वप्नींचा पुतळ्या

लवल्या नक्षत्रलता लाल पिवळ्या
आनंदाच्या फुटल्या ग मला उकळ्या

स्रवली नयने हृदयातून उसळयांवर उसळ्या
गंधित मोहित होत फुलल्या चाफेकळ्या

***

# वर्षाव

रिमझिम बरसती रेशीमधारा
संगे झोंबतो गारगार वारा

टपटप पडती छपरावरती
दारात पावळ्यांचा पहारा

अंगणात उसळती तुषार मोती
पानापानातून ओघळती धारा

तृप्त मातीचा सुगंध मोहवी
निसर्गातला शीतल नजारा

किलबिल करीत पक्षी परतती
शोधती घरट्यांचा सहारा

तनही चिंब, मनही चिंब
विहरती जसे फुलपाखरा

ओढ दाटे मनी अनामिक
स्वप्नातल्या त्या राजकुमारा

***

# मन

मन मोहरते मन बावरते
मन स्वप्नात मनीच्या उमलते

मन कोसळते मन रडते
मन निष्पर्ण वृक्षासम भासते

मन गोंधळते मन पिंजारते
मन आडव्या उभ्या धाग्यात गुरफटते

मन एव्हडे मन तेव्हडे
मन मनास कधी ना जोकते

मन विविधरंगी मन विवीधढंगी
मन आपल्याच नशिबात विसावते

***

# अंतर्नाद

चांदण्याचा ध्यास उभरे नभात
आभास तुझा माझ्या मनात

खळखळता नाद घुमे डोंगरात
अंतरीची हाक तुझी स्वप्नात

समयीतील वात उजळी गाभाऱ्यात
प्रेमाची वात जळे माझ्या जीवनात

बगळ्यांचे थवे निळ्या आभाळात
वेडीपिशी माया धावे तुझ्या पाशात

रातकिड्यांची किरकिर निशब्द स्मशानात
उरातील धडधड मनीच्या अंधारात

***

# बंडखोरी

काळोखतल्या स्निग्ध मनात
चांदणे भासे कधी अनामिक

रोज लख्ख तप्त प्रकाशात
सुखवी एक ढगाळ छाया

नको रोज पौर्णिमेचा चंद्र
कधी भावे अमावस्या गर्द

भीती वाटे अतिसुखाची
दुःखाची वाटे जवळीक मनासी

उधाण कधी बंडखोरीचे
पारतंत्र्यातल्या रिक्त क्षणांचे

***

# निसर्गभावना

स्पर्श तो गुलाबाचा
धपापणाऱ्या उरांचा

गंध तो रातराणीचा
हळुवार भावनांचा

रंग तो गुलमोहराचा
उसळणाऱ्या हर्षाचा

तरंग त्या कमलपुष्पांचा
शांत निशब्द डोहातला

सडा मलमली प्राजक्ताचा
निर्मल निष्पाप मनातला

खेळ सारा विश्वातला
निसर्गातल्या अदाकारीचा

***

# निरर्थ

उगीचच कधी हसायचे
उगीचच कधी बोलायचे

भिजत कोपऱ्यात धुमसायचे
अटळ आयुष्य टळत टाळायचे

रडत लोचन कोरडे जाळायचे
वेदनेत घरच कधी उधळायचे

कधी हसणे तुझे झेलायचे
तुटलेले मन कधी बांधायचे

दिवास्वप्न जरी दुभंगले
पुन्हा पुन्हा मागे वळायचे

भास इथले कधी ना संपायचे
उगीचच तेच तेच चेहरे जमवायचे

उगीचच रिते होत सांडायचे
कसेबसे बेगडी जिणे हे जगायचे

***

# शिक्षण

शिक्षण बनतेय पाठांतराचे धडे
नाही उरले शिक्षक अभ्यासक गाढे

पैसे –सत्ता रेटती भ्रष्ट संस्थांचे गाडे
शिक्षणाचा दर्जा दररोज कोलमडे

एखादा असे जाणता, तो एकटा पडे
बाजारात त्याच्या विद्वत्तेचे धिंडवडे

नव्वदी पार करती पुस्तकातले किडे
समग्र वाचन–चिंतनाचे सर्वांस वावडे

कोण नंबरी वाटे गावास पेढे
कोण बिचारा घाले मानेस वेढे

***

# संभ्रम

जरी आला आषाढ तो ओला
मेघमल्हार गायचा राहून गेला

आठवू लागलो गंध तो स्वप्नातला
शृंगार रात्रीचा पहाटे निसटून गेला

श्वास जरी तेव्हा चुकीचा घेतला
तो भूतकाळ आता विस्मृतीत गेला

असा कसा होता तो भ्रमाचा कुंचला
खोटे नाटे चेहऱ्यांचे भाव चितारून गेला

भाडोत्री काजव्यांचा प्रकाश विझला
काळोख आभाळी विकोपास गेला

ना मिळता उत्तर रडवेला झाला
संभ्रमात गहन प्रश्न विचारत गेला

***

# जय श्री राम

आली समविचारांची नवी पहाट आली
सांगू तरी कसे या अदृश्य जानव्यांना

रीती माझी निधर्मी जातीपातीची झोळी
देशात मान यांच्या भगव्या जोगव्यांना

समाजवादी आतड्यांचा पीळ होत आहे
कधी कळेल का या धर्मवेड्या बांधवांना

दिलास तूच आरक्षणाचा रिक्त पेला
थेम्ब नाही त्यात, पण धुंद त्या धर्मांधांना

लाज वाटे पाहता उन्माद सत्ताबळाचा
आर्त मुक्या वेदना अल्पसंखी सजीवांना

नसले तरी चालतील रुपये कोटीकोटी
नको अघोरी ओहोटी समतेच्या तत्वांना

तिरंग्यात लपेटले शहीद माझे नी तुझे
गडद भगवा मात्र फडफडणाऱ्या ध्वजांना

***

# अभागी

भाजून गेला पारतंत्र्याचा उन्हाळा
कोरडा आता स्वातंत्र्याचा पावसाळा

चंद्र नव्हता तेव्हा काळोखी आभाळा
आजचा पेटणारा सूर्य देखील काळा

चेहरा नव्हता या मातृभूमीत निराळा
रस्त्यावरी उडणारा केवळ मतांचा धुरळा

सत्तेच्या राजकारणाचा सर्वांस चाळा
कोणास नसे कंगालांचा जिव्हाळा

जरी राहिलो लोकसत्तेत नामानिराळा
तरी कोंडलेला श्वास घेण्याचा जुनाच लळा

***

# मँडरीन मुली

मँडरीन मुली दिसतात
चींटूकल्या गोऱ्या ...
बारीक त्यांच्या भेदक
चिनी नजरा ....

सगळ्या एकाच
साच्यातल्या सुंदऱ्या ...
कश्या काय यांना
ओळखतात खऱ्या ...

तरुणपणी दिसती
गोऱ्या पऱ्या ...
चाळीस नंतर
सुरकुतलेल्या म्हाताऱ्या ...

चिंग च्याव करिती
सतत साऱ्या ...
शिस्तीचा मात्र
पुरता बोजवारा ...

पितात चहा
काळा दिवसभरा ...
नूडलस-भातावर
त्यांच्या नजरा ...

इकडून तिकडून
पळती तरातरा ...
नसतो त्यांच्या
पायांना थारा ...

जरी असल्या
काळ्याभोऱ्या ...
तरी मुली आपल्या
भारतीयच बऱ्या ...

***

# पाऊस निराळा

तडतड पडती छपरावरती
कोसळणाऱ्या जलधारा

लकलकत्या थरथरती विजा
गडगडत्या गर्जनेचा शहारा

सरीवरसरी बरसती रेशीमधारा
रसरसलेल्यांना ओला किनारा

झोम्बाझोंबी करीत आला वारा
डोलत्या झाडांचा जोश न्यारा

झुळझुळ पाने गाती गाणे सारे
दरिदरीतून वाहे सौन्दर्याचा झरा

फडफडवित चिंब पंख अपुले
पक्षी शोधती घरट्यांचा आसरा

शेतकऱ्यांचा हसला चेहरा
गुराढोरांस दिसे हिरवा चारा

ओलेचिंब होते तनमन दृष्टीत
गडद नभातला सृष्टीचा नजारा

धुंद तृप्त ओले होऊन
रात्रभर मुग्ध बरसणारा......
पाऊस निराळा ......

***

# मानवता

केवळ व्यक्त होणे
कोरडे संभाषण..
सहवेदनेने जोडणे
मानवतेचे आभूषण..

टाकून देऊ व्यथा
अहंकाराचे कोंदण..
मी हेच सर्वस्वी
एकटेपणाचे कारण..

सहकार्यात समजते
इतरांचे मोठेपण ..
शत्रूस देखील द्यावे
मैत्रीचे आलिंगण ..

भौतिक स्वार्थ हेच साऱ्या
ताणतणावाचे रणांगण..
निस्वार्थ परमार्थ हे
उज्ज्वल मानवाचे लक्षण..

***

# अपेक्षा

व्यर्थ ताणाची मी
पर्वा करीत नाही
कुणालाही कुणाचीच
इथे दाद नाही

अथांग सागर उसळे
यातनांचा डोही
कष्टाने जाईन सामोरे
यात वाद नाही

धेय्यसक्तीने भारले
सुखावते मन माझे
नको तुलना जीवघेणी
कशाला अपेक्षांचे ओझे

कशाला कवटाळू
दाही दिशांचे हुंदके
आसवांनी भिजले
क्षण आनंदाचे मोजके

तुम्ही काय म्हणता
याचा विषाद नाही
मी प्रयत्न करितो
माझा प्रमाद नाही

जिंकलो तरी मी
हरलो तरीही मी
बाद होत गेले सारे
तरी मी बाद नाही

***

# अभागी

रात्र अशी अंधारली
तेवत नसे दीप कुठे

अडखळती पाय इथे
अंथरले पथी काटेकुटे

तूच विझवले दीप सारे
तूच पाठवले मला इथे

आशेचा किरण नसे
दूरदूर ती वाट तिथे

ढेपाळले तुटले भंगले
मातीचे हे भग्न इमले

नियतीच्या खेळात
अंती अवशेष उरले

***

# देहविक्री

कोण म्हणे देवदासी कोण अंगवस्त्र
एकच भाव जरी विविध त्यांचे नाव

पिढ्यानपिढ्या अमीर आणि राव
यांच्या वासनापूर्तीचा हा गलिच्छ डाव

नाईलाजाने काहींनी स्विकारला
विकृत समाजवृत्तीचा हा घाव

ओठावर लालभडक हास्य मूक
क्षणभर उग्र मादकता विक्लान्त

नटल्या थटल्या शरीरामागील
थिजलेल्या ह्रदयाचा आक्रन्द

फुटक्या पणतीतली कोरडी ज्योत
पोटात जिच्या विछिन्न मनाचे प्रेत

कशाला लावला देहविक्रीचा दाव
कष्टाने जगण्याला नाही का भाव

***

# लता

कधी ऐकतो तुझे मंजुळ गान
तिथेच थांबतो विसरून देहभान

सुरासुरांतून उमटे उत्कट तो भाव
जणू पारिजातकाचा कोमल वर्षाव

मंद्र लयीतली आर्त ती मोहक झार
तप्त सुरांची जणू तू खेचतेस तार

काळोखातुनि दुरुनी दिव्य तो नाद
मनातल्या रणी उमटे शांत पडसाद

आळवे तुझे मधुर संगीतगान
तरल तनमनाला करीती बेभान

***

# आंबोली

पावसात आंबोली चौकुळ घाट
निसर्गाचा रमणीय स्वर्गीय थाट

गर्द हिरवळीने सजला धजला घाट
चहूकडे धबधब्यांचा खळखळाट

धुक्यात हरवती वळणाची वाट
झोंबणारा गार वारा वाहे सैराट

संततधार पाऊस सुखवी मनास
दऱ्या खोऱ्यात पसरले धुके दाट

कावळेसादला धुक्याचा लपंडाव
उलट पाऊस वाऱ्याचा खेळ अफाट

महादेवगडाचे दृश्य मोहवी जीवास
हिरण्यकेशी साधुसंतांची वहिवाट

चौकुळचे जंगल हिरवे घनदाट
जागोजागी वाहती पाण्याचे पाट

नभी गुंजतो वाऱ्याचा सळसळाट
झाडापानात पक्षांचा किलबिलाट

मटण भाकरी इथली थोडी तिखट
घाटात भजी चहाची गोडी अवीट

बेभान मद्यधुंद पर्यटक होती सुसाट
करीती मनोहरी निसर्गाचा नायनाट

***

# हवासा

सुखाचा प्यासा....
तो मलाही हवासा

प्रेमाचा प्यासा.....
तो तुलाही हवासा

स्पर्शाचा उसासा ....
दडला मनात कसा

शोधला असा ....
स्वप्न पूर्तीचा उसासा

दुख्खात दिलासा ....
केला चुकांचा खुलासा

निराशेत दिलासा ....
खोट्या अपेक्षांचा खुलासा

जाणला कसासा ....
भग्न स्वप्नांचा भरवसा

***

# जगणे जगलो

हास्यात हुंदक्यांना स्वीकारात गेलो
शोधत फुलांना काट्यावरून गेलो

उध्वस्त याचनेचे कोरडे मेघ दाटले
अश्रूंच्या पावसात भिजताना गाठले

रंगलेल्या गालाचे मुकेही पहिले
भुकेलेले व्याकुळ दिनही अनुभवले

अरुंद वाटेत स्वतःला सांभाळले
राजरस्त्यात जमिनीवर राहिलो

ही वाट चालताना दमलो भागलो
जगण्याच्या निश्चयाने तरून गेलो

***

# बदल

आपण गरजेपेक्षा शिकलो
बाजारात स्वतःला विकलो

खेळणे कसले विसरलो
जीवघेण्या स्पर्धेतच रमलो

प्रखर दिव्याला सूर्य म्हटले
दिवसभर ऐसीत कुडकुडलो

माणुसकीने बोलणे विसरलो
मोबाईलच्या दुनियेत गुंतलो

देवळे श्रीमंत संस्थाने झाली
देव दर्शनासाठी रांगेत थकलो

भावुकता कमजोर केली
व्यावहारिक स्वतःस संबोधले

मनाची शांती हरवून बसलो
औषधात आरोग्य धुंडाळले

भौतिक पाठलागात हरखलो
सुखाची व्याख्याच विसरलो

***

# उमंग

निळभोर आभाळ
गडद भरून आलं

कौलांवर पावसाचं
पाऊल वाजू लागलं

दारातल्या पावळ्यांनी
मन भिजू लागलं

रंगीबेरंगी फुलांनी
रान गाजू लागलं

हिरव्यागार रंगानी
झाड सजू लागलं

अशीच ओली रात्र
अंग चिंब झालं

त्या आठवणीने
मन लाजू लागलं

विसावलेल्या गाभ्यातं
मन उमंग पावलं

***

# अगतिक

कुणीतरी जा म्हटलं
म्हणून शाळेत जावं लागतं

कुणीतरी गा म्हटलं
म्हणून गाणं गाव लागतं

वयात आलं म्हणून
बंधनात अडकावं लागतं

पोटाच्या खळगीसाठी
रोज मरावं लागतं

सुखदुःखाच्या लहरींवर
स्वार व्हावं लागतं

आतून रडताना
खोटं हसाव लागतं

जरी महागाई वाढली
क्रीकेटमध्ये रमावं लागतं

खोट्या आशेपोटी
मत द्यावं लागतं

मतांच्या जोगव्यासाठी
रामभक्त व्हावं लागतं

सत्ताधीशांच्या मुजोरीला
लाचार व्हावं लागतं

सूर्य जरी झाकोळला
स्वातंत्र्यगान गावं लागतं

प्राक्तनाने दिलेलं
जगणं जगावं लागतं

***

# स्वप्नसुख

गंध केवड्याचा तुझा
मोहवी मुग्ध मनाला

लकेर ती हास्याची
उधाण येई आनंदाला

गालावरची गोड खळी
वेड लावी जीवाला

रेखीव तुझी कमनीयता
उभार आतुर मनाला

चाल तुझी ऐटदार
सुखवी नयनांला

मोह रेशमी स्पर्शाचा
धुंद करी अंतरंगाला

स्वप्नातले सौन्दर्यसुख
विशाद या जागेपणाला

***

# माझे गुरू

आई –वडील –शिक्षक माझे गुरु
त्यानंतरच माझे अस्तित्व सुरु

पाणी– अन्न –हवा माझे गुरु
त्यांच्याविना मी कसा तरु

पाने –फुले –पक्षी माझे गुरु
निसर्ग हाच माझा कल्पतरू

प्रत्येक सुखदुःख माझे गुरु
त्यातूनच तावून सुलाखून उरू

जगताना प्रत्येक क्षण माझा गुरु
गुरुपोर्णिमेला कोणाची पूजा करू

***

# सागर

निळ्या पांढऱ्या गर्जती लाटा
पुसती वाळूतल्या पाऊलवाटा

क्षितिजावर डोलणारी पांढरी शीडे
चीत्रकला रेखाटती वाळूवर खेकडे

दृष्टीत नसे दूरवर कुठे पैलतीर
नभीचे नीलरंग मिटती जलावर

संपूर्ण कमानीत इंद्रधनूचा नजारा
संगे सुखावणाऱ्या पावसाच्या धारा

सोसाट्याचा झोंबणारा वारा
गाज जागवी रात्रीचा पहारा

झुलती किनारी उंच उंच माड
सळसळत्या बनात सुरुचे झाड

दीपस्तंभ एकला ध्यानस्थ मुनी
जागता डोंगरावर परी रात्रंदिनी

थकून भागून गाठला तुझा किनारा
शिणल्या मनावर तरारे उमंग न्यारा

***

# गोमांतक

गोव्यात राहिलो पावसात चार दिवस
भावला हा सुशेगात जगण्याचा ध्यास

फेसाळत्या लाटांत विसरलो मन उदास
समुद्राचा गाज सुखवी तनमनास

मागे निळाभोर पोहण्याचा तलाव
पूर्वेस गच्चीवर पाहिला पावसाचा वर्षाव

सकाळी घेत कॉफीची लज्जत
स्फुरते एखादी कविता मनात

फुलझाडांभोवती फुलपाखरे चार
आंब्यावर कलमी पळणारी खार

उधाणात बंदिस्त मासेमारीच्या होड्या
कोळी ओढती विसावाच्या विड्या

जाईजुईसारखा उकडा वाफाळता भात
संगे निस्त्याचे हुमण खावे गोव्यात

चहूकडे उजळणारे उंच देवळांचे घुमट
जागोजागी क्रूस हा पोर्तुगीजी थाट

शास्त्रीय संगीतात डोलती तासनतास
पाश्चिमात्य तालावर नाचती तेव्हढेच जोरात

विस्मयकारी गोव्याची निर्भेळ साद
पुन्हा घ्यावा गोमांतकी आस्वाद

***

# सामान्य

सामान्याला नाव नाही
सामान्याला गाव नाही

माजलेल्या बाजारात
माणुसकीला भाव नाही

स्वार्थी अहंकारी जगतात
विनयशीलतेला वाव नाही

अर्धपोटी भुकेलेल्यांना
संस्कृतीची हाव नाही

वंचितांना मानहानीसारखा
दुसरा कोणता घाव नाही

चितेवरच्या मर्तिकाला
रंक अथवा राव नाही

***

# आर्तता

स्वप्नातल्या कळ्यांनो
फुलु नका कधीकधी

निष्पाप तो गंध राहूदे
स्वप्नातच अधीमधी

इच्छेच्या खरुजेतला ‘ख’
खाजवीत जगतो आम्ही

खऱ्यातल्या ‘ख’ चा
दाखला नको उगीच तुम्ही

गरजेपुरता ‘ग’ आणि
माझा ’मी’ जपतो आम्ही

विटलेल्या या चिखलात
निर्माल्य होई फुलण्याआधी

स्वप्नातल्या कळ्यांनो
फुलु नका कधीकधी

***

# पाऊस आला

पाऊस आला
पाऊस आला

मातीचा मृदगंध घेवून
पाऊस आला
कोवळा सुगंध लेवून
पाऊस आला

वाऱ्याची साद घेऊन
पाऊस आला
ओलीचिंब याद घेऊन
पाऊस आला

हिरव्या ध्यासाचा
पाऊस आला
फुलणाऱ्या श्वासाचा
पाऊस आला

खळखळत्या झऱ्यांचा
पाऊस आला
नदीनाल्यांच्या पुरांचा
पाऊस आला

जगण्याच्या उत्सवाचा
पाऊस आला
मरणाच्या दुख्खाचा
पाऊस आला

बाहेरून घराघरात
पाऊस आला
आतून मनामनात
पाऊस आला

***

# वास्तव

रडत रडत जगत
आयुष्यात भंगलो

आंधळेपणी पळत
जागेपणी अडखळलो

काट्यांवरून चालत
रक्तबंबाळ झालो

खळगीच्या भुकेत
संस्कार विसरलो

वेदना कवटाळत
जिवंतपणी जळलो

अस्तित्वाच्या लढाईत
आत्मभान हरवलो

सुखाच्या पाठलागात
आनंदाला मुकलो

***

# वर्षाव

भरलेले गडद आभाळ
कोसळताना पाहिले

ओसंडणाऱ्या धारा
तडाडतांना पाहिले

टपोरे थेम्ब अंगणी
नाचताना पाहिले

उंच उंच ताड माड
डोलताना पाहिले

थरारती पाने झाडे
झुलताना पाहिले

कोरड्या भावना
भिजताना पाहिले

थंडगार वाऱ्याने
श्वास ओलावले

चिंब या वर्षावात
स्मृतिगंध दाटले

***

# दारिद्र

दूरदेशा गाव,
इथे फाटके झोपडे
शोधण्या घास,
आले बिचारे बापुडे

राखण्या लज्जा,
चिंध्यांची लक्तरे
अंतरी वेदनेचे घाव,
माथी कष्टाचे जोखडे

डोळ्यातल्या निखाऱ्यात,
आटली आर्त आसवे
भुकेने पेटलेले,
व्याकुळ ते आतडे

झाकलेल्या डोळ्यात,
दीसती माय लेकरे
आठवणीने त्यांच्या,
पडती काळजाला तडे

अवतीभवती महाली,
वाजती सनई चौघडे
दीनवाणी याचना,
बेछूट धनदांडग्यांपुढे

थांबला गोठलेला श्वास,
पापणी खाली पडे
घोंगावती माश्या,
निश्चल मुद्रेवर बागडे

मूक प्रेत गर्जती,
या संस्कृतीचे वाभाडे

तीस कोटी दैवतांच्या,
दयेची साक्ष देती हे मढे

क्रांतीचे गीत गाती,
राजकीय भेकडे
जयघोष स्वतःचा,
करीती चोहीकडे

***

# पहाट

संपत रात्र आता उगवली पहाट
काढ सखे तुझे चांदण्याचे हात

स्वप्नासवे लुप्त होई चंद्र नभात
अंधार विरतोय प्रकाश सागरात

धुक्यात सुरु पाखरांचा गलबलाट
मौन आता रातकिड्यांचे भावगीत

अंगणी पारिजातकाची शुभ्र रास
वाऱ्यावर पसरले गंधित श्वास

ओलसर दव गवतावर आसपास
जसा तारकांच्या आसवांचा भास

धूसर दूरच्या आकृत्यांना येई जाग
कुजबुज हळूहळू होई जागोजाग

रात्र आली आता संपत संपत
क्षितिजापलीकडे दिवसाचे दूत

***

# धुंद

संततधार वर्षावात जरी वाटे कुंद
बेहोष करिती फुलपाखरांचे रंग

वाऱ्यावर रातराणी करी धुंद
मोहवी सुवास तिचा मंद

परसात व्याकुळ निशिगंध
सुगंधी केवड्याचा त्यास संग

माजघरात तेवते वात ती मंद
मनीचा एकलेपणा होतसे भंग

कानी पडे आर्तवाणीतला अभंग
रुणझुणता नाद बने निःसंग

ज्ञानेश्वरी ओव्यातला उमंग
जागवती सगुणी सत्संग

***

# मी माझा

मी न जगाचा
मी न कुणाचा
मी माझ्या अंतरंगाचा
तरीही सारा पसारा
माझ्याच आत्मप्रेमाचा

मी स्वच्छंदी
मी छंदी
मला न कुणाची पाबंदी
तरी विविधरूपी सृष्टीचा
मी आजीवन बंदी

मी निरंकारी
मी शून्यकारी
मला न कोणती अदाकारी
तरी वस्तुजात या विश्वात
मी मोठा अहंकारी

मी शूरवीर
मी योगी
अदभूत माझे ध्यान
तरी निसर्गातल्या स्वर्गात
मीच विश्वाचा प्राण

***

# संदिग्ध

कुठून येती अचानक
उदासीनता अंतर्मनाला

काय बोचते समजेना
हृदयातल्या गाभाऱ्याला

इथे नाही तिथे नाही
काय अजून साधायाला

कुणीकडे वाहतो वारा
हाक मारी मन कोणाला

नाते बंध विरून जाती
छेद देत या संभ्रमाला

मुक्या मनाचे मुके बोल हे
उरी वेदना या जगण्याला

हुरहूर दाटे मनी अनामिक
दिव्य औषधी आहे का त्याला

***

# अनुभव

वास्तवाशी खेळताना
सारे सुख दुःख पाहिले

सत्यवादी जरी अप्रकाशित
कधी ना हरलेले पाहिले

बालपणीच्या जडण घडणीत
तत्वांनी समर्पित जगणारे पाहिले

व्यावहारिक स्वार्थी जगतात
स्वत्वाला फक्त जागणारे पाहिले

गोलमाल या दुनियेत
चढले पडले घसरले

पडता पडता सावरले
एकाच आयुष्यात अनुभवले

***

# पावसातले कोकण

वाट ही वळणी घळणीची
हिरव्यागार शेतामधली

दुतर्फा किनार सुंदर
पिवळ्या रानफुलांची

ओसंडणारे शुभ्र पाणी
भातशेतातल्या पाटांत

खळखळते लाल प्रवाह
धावती तुडुंब ओढ्यात

डोलणारे भाताचे शेत
बोलते वाऱ्याचे गीत

तृप्त झाली गुरेढोरे
खाऊन हिरवा चारा

हुंदडती त्यांची वासरे
पिऊन गार वारा

झुडुपातले जनावर
गुडूप होई सरसर

घामेजला जरी चिखलात
सुखावला पिकपाण्यात

इरल्यांची माळ दिसती
कोसळणाऱ्या धारांत

पाऊलखुणा या पावसाच्या
कोकणातल्या गावागावात

***

# अमृतसिंधु

वळून बघता मागे मागे
घडले तेच आता पसंत

जरी वाढले अमाप व्याप
तरी त्यातच उदंड उसंत

पहाटेच्या प्रातःकाळी
शब्दसुमनांची संगत

काव्यावाटे मन बोलती
सगळे खेद नी खंत

पावसात भिजुनी होती
दगडही हरित श्रीमंत

कोणी न उरे परके आता
सारे भेटती ते गुणवंत

श्रावणताही स्पर्शून जातो
कधी अशरीर वसंत

शहारून कधी बोलतो
हृदयातील रसवंत

चालता जरी काट्यांवरूनी
उमले गंधित कुसुमित पंथ

जगण्यासाठी संतवाणी
बोलून गेले सारे संत

जपा सुविचारांचा अमृतसिंधु
तेव्हाच भेटे खराखुरा भगवंत

***

# वादळी पाऊस

आज अचानक कोठून आला
सोसाट्याचा अदभूत वारा

झाडे झुडपे घुसमळीत झेलती
वादळी पावसाचा रूद्र मारा

खिडक्या दारे स्वैर उघडुनी
येति स्वर्णील अमृतधारा

झोपाळ्यावर डोलत बघतो
कोपलेला तुझ्या अवतारा

अहं झाडुनी लखलखला
समिधांमधील निखारा

वातीवरची झडून काजळी
अंकुरला उदास मनीचा तारा

अज्ञानाचा धूप जळाला
गंधित झालो दिव्य तेजाने

कवितांवरची धूळ उडाली
फडफडली वाऱ्यावर पाने

शब्दांचे तोडुनी प्रचलित बंध
मुक्त अनावर मनीचे गाणे

***

# दुभंग

जगण्याचा अर्थ शोधता
शब्द नेमके फाटले

अपेक्षांच्या धुंदीत
तरलतेचे उमाळे छाटले

वर्चस्वाच्या लढाईत
हृदयातील स्पंदन गोठले

भावनांशी खेळताना
हुंदके गळ्याशी दाटले

आतून दुभंगताना
मैत्रीचे झरेही आटले

***

# तू दे

सोसवेना ही मूक शांतता
तू बोलण्याची साथ दे

नको जीवघेणा हा एकांत
तू सहवासाची बरसात दे

रातराणी बहरेल जेव्हा
तू शुभ्र चांदण्याची रात्र दे

गर्दीत उभ्या भिंती परक्या
तू ओळखीचा श्वास दे

काळोख संपेल कधीतरी
तू विश्वासाची सोबत दे

किती देशील सतत काहीतरी
एकदा देणारे हातच दे

***

# शब्दसामर्थ्य

श्वासासारखं सरळ बोलता येत
साध्या शब्दांनी हृदय खोलता येत

शब्दाला शब्दाने कलह होतो
दुरावलेल्या नात्यात विरह येतो

दुखावणारे शब्द नकळत सुटतात
पण तेच थेट काळजात घुसतात

शब्दांनीच जुळतात गोड नाती
कधी ओलावतात डोळ्याची पाती

नाते तुटताना शब्दांना येते धार
या धारेनेच होतो कायमचा वार

हजारो चांगले शब्द विसरतात
एक वाईट मनात कोरून ठेवतात

सय्यमी येत नसेल बोलण
तर शहाणं असतं शांत राहणं

***

# तुला पाहतो

जेव्हा तुला लाजलेली पाहतो
सुखाच्या धुंद स्वप्नात मी नाहतो

जेव्हा तुझी बावरी पापणी लवते
आठवणींची आर्जवे मी वाहतो

जेव्हा तुझा शब्द ओठात ओलावतो
अनोखा तुझा सुगावा मला भावतो

जेव्हा फुलांचा बाण उरी लागतो
त्यांच्या मुग्ध सुगंधातच मी फुलतो

जेव्हा तुझ्या सभोवती वारा घुमतो
उठणाऱ्या तरंगात मी डोलतो

जेव्हा तुला लाजलेली पाहतो
हास्यात हुंदक्यांना ओलांडून जातो

***

## मन मुक्त झाले...

अक्षरांच्या आत मन दडलेले
मातीत जसे बीज गाडलेले

पावसाच्या वर्षावात फुलले
अंकुर कोवळे मनी उगवले

संपला जीवघेणा कोंडमारा
मुक्त मन कोंडीत भिजलेले

कोणास स्पर्शिले का नाही कळले
व्यक्त झालेले मन पुलकित झाले

एकटयाने लिहिण्याची खंत ना मना
अपुल्या नात्याशी ऋण बांधलेले

***

# जिंकलो तरीही

जिंकलो जरी मी
हार माझीच झाली

मनातली मृदुल फुले
साफ कोमेजून गेली

जरी खेचले श्रेय मला मी
वेडी जिद्द ती भार झाली

स्पर्धेत जरी मी रमलो तरीही
मुक्या वेदनेची रात्र जागून गेली

तारकांनी पुन्हा साद नाही दिली
आतली पोकळी काळोख प्याली

***

# वास्तव

कधी बहर ओसरतो
दुख्खाचा कहर येतो

हृदयावर जड दगड ठेवून
दुखरा सूर लावावा लागतो

तळपणाऱ्या सूर्याला सुद्धा
ग्रहण कधी लागावं लागत

शांत शीतल निलयाला
सुनामीचं उधाण यावं लागत

हर्षाच्या सुखद उतारानंतर
कष्टाचा डोंगरचढ लागतो

दिवस रात्रीच्या पाठशिवणीत
स्वतःला मग्न रहावं लागत

आशा निराशेच्या धाग्यांचे
जीवन गुंफत जावं लागतं

***

# बदल

आपण खूप खूप शिकू लागलो
बाजारात स्वतःला विकू लागलो

मुलं बोलणं खेळणं हसणं विसरली
मोबाईलच्या क्षयात सुकू लागली

संगीतातला हळवा सूर गमावला
वाद्यांच्या गोंगाटात रमू लागलो

देवळं सुद्धा दयाभाव विसरली
नाण्यांच्या जोरांवर टिकू लागली

बेगडी दर्जा जपण्याच्या नादात
समर्पित मैत्रीभावना थकू लागली

सत्ता स्पर्धेच्या जिवघेण्या वेगात
माणुसकी निमूट झुकू लागली

***

# झुंझूमुंजू

झुंझूमुजू झालं बाई झुंझूमुंजु झालं
ओलंसर धुकं पांढरं दवात विरलं

कोकिळेनं भूपाळीच सूर धरलं
किलबिलाटानं सारं रान जागलं

ओसरत चांदणं परसात न्हालं
बकुळीच्या वासाचं अत्तर सांडलं

अंगणात शेणाचा गं सडा सारवलं
माळावर पलीकडं कोंबडं आरवलं

देवळात पहाटेचं घंटानाद झालं
हंबरण्यानं वासराच्या गोठा उठलं

निळ्या आभाळात केशर उधळलं
फेसाळणाऱ्या लाटेत अभ्रक दिसलं

पहाटेच्या येळेला मन खुश झालं
दिसाच्या कामाला अंगी बळ आलं

झुंझूमुजू झालं बाई झुंझूमुंजु झालं
ओलंसर धुकं पांढरं दवात विरलं

***

# ऐक देवा

ऐक देवा एकच माझी साद
पचू न दे मला एकही प्रमाद

ठेच अचानक लाव पायाला
यशाचा जर चढला उन्माद

परदुःखावर लाभले जर सुख
दुख्खाचे लाभुदे शत पडसाद

अपराध घडला जर हातुनी
धुमसत ठेव जन्मभर विषाद

शिक्षेस तोलला तराजू
नको करू मज अपवाद

स्वार्थाने जर विटले मन
मागे लाव माझ्या प्रवाद

या जन्मीच्या चुकभूलांचा
देवा या जन्मीच दे प्रतिसाद

सुकृत काही घडले हातून
दे आनंदी जगण्याचा प्रसाद

एव्हडी शक्ती दे मजला देवा
जागृत राहू दे सात्विक अंतर्नाद

***

# नभ दाटले

विमानातून आज अनुभवले
वाहणारे नभ मी पाहिले

जसे कापूस सर्वदूर पिंजले
धरतीस मऊमऊ पांघरले

पांढऱ्या काळ्या सश्यांनी व्यापली
निळ्या आकाशाची निरभ्र शकले

किरणांनी ढगाआडून डोकावले
शुभ्र झोत त्यांचे मधूनच पडले

चंदेरी कडा सभोवती चमकल्या
विलोभनीयतेचे स्वर्गसुख लाभले

विमान थोडे ढगात डगमगले
क्षणिक भीतीचे काहूर दाटले

मनास खरोखरी वाटले
अजि म्या ब्रह्मा पाहिले

***

# केपटाऊन वॉटरफ्रन्ट

सूर्यास्ताचा झोंबणारा गार वारा
उसळत्या अवखळ लाटांचा मारा

खडकाळ परी सुंदर किनारा
किनारी शिडांत भरला वारा

पूर्वेस टेबल माऊंटनचा पहारा
पश्चिमेस केशरी रंग नभी न्यारा

केपटाउनआयचे चक्र फिरे गरागरा
आफ्रिकन नृत्यात बीट्सचा थरारा

लुकलुकत्या दिव्यांचा भव्य नजारा
अटलांटिक थंडीचा अनुभव साजरा

उधळल्या बटा अन केसांचा पसारा
उल्हसित मन कादंबरीच्या सहारा

***

# केपटाऊन ते अक्विला सफारी

मैलोनमैल पसरले
द्राक्षाचे शिस्तबद्ध मळे

अधूनमधून दिसती
कृत्रिम पाण्याची तळे

छोट्या छोट्या झोपड्यातुन
कामगारांचे दारिद्र्य कळे

निर्वासितांची सरकारी
वस्ती मधूनच आढळे

पिवळ्या केसरी फुलांचे
रस्त्यादूतर्फा रंग आगळे

दूरच्या डोंगरमाथ्यावर
शुभ्र बर्फ कडे निथळे

उंचउंच कडीकपारीवरी
खुरटलेली झुडपे वेगळे

उंच वृक्षांचे अस्तित्व
फार फारच विरळे

उघडया जीपमधून फिरताना
वन्य प्राण्यांचे दर्शन मिळे

सिंह गेंडा हत्ती जिराफ
हमखास दिसती चितळे

सफारीच्या या प्रवासातले
नयनरम्य परी दृश्य आगळे

***

# मंडेलांचा तुरूंग

आज आफ्रिकन रॉबेन बेट पाहिले
स्वातंत्र्यसंग्रामाचे साम्य पाहींले

मंडेलांचा एकाकी तुरुंग पाहिला
२७ वर्षांचा तुरूगवास पाहिला

समानतेसाठी संघर्ष पाहिला
वंशभेदि सत्तेविरुद्ध लढा पाहिला

सुबुक्केची बलिदानकथा ऐकली
दक्षिणआफ्रिकेची जन्मकथा पाहिली

गांधीजींचे निस्सीम भक्त पाहिले
सत्य अहिंसेचे सामर्थ्य पाहिले

अंदमान तुरुंगाशी तुलना करता
सावरकरांच्या व्यथा कळल्या

आफ्रिकन उच्चभ्रू वस्त्या पाहिल्या
इथल्या दारिद्र्यगाथाही पाहील्या

इथला अद्वितीय निसर्ग पाहिला
या दौऱ्याने खरच कृतकृत्य झालो

***

# कालचक्र

विश्व गवसणीस निघाली पाखरे
वाट पाहती ओले डोळ्यांचे किनारे

कधी परततील का हे नभिचे तारे
निस्तेज घरी जागवी तेजपुंज सारे

घराघरात आनंदी हास्याचे फवारे
घरभर विस्कटून होतील पसारे

किलबिल करीती चिमणी पाखरे
आठवणीने त्यांच्या मन वेडे पुकारे

नशीबवान फारच थोडे वडीलधारे
ज्यांना अखेरपर्यंत पिल्लांचे सहारे

सोसवेनात हे एकलेपणाचे शहारे
निसर्गाचे कालचक्र हे असेच न्यारे

***

# मालवण गणपती

झिला बेगीन बेगीन कर रे
फाल्या गणपती येतलो रे

निळ्या रंगाचो पुडो हाडून
भायल्यान जरा मार रे

फाटेक मुमैवालो येतलो
शितल्याक एस्टीर धाड रे

बापूस कित्या ओगीच करवादता
नया आंगातला शिवल्यान मरे

माठयेक बांधूक फळांवांगडा
आंब्याचे टाळ आणि हरणा हाड रे

कत्रालयातली समय काढून
बायेक राखेन बरी घासूक लाय रे

गुमास्ताचो माळारचो पडदो
आणि लायटीचो फोकस काढ रे

तबल्याचो पुडो अवनु फुटलो मेलो
टाळ खय टाकल्यानं तेतरी बघ रे

सड्यावयली दुर्वा उपटून हाड मरे
मंदाच्या परड्यात फुला बघ रे

आयेन देईचो फोटो लोटो आणि
म्हादेवाचो नाल ठेयल्यान काय रे

बेबला नुस्ता मुमैवाल्यार मुराडतां
तेका वस्त्रा वाती वळुक लाय रे

हरताळकेच्या आवरणाक
चार आडसारा उतरून दी रे

नौबतवलो म्होम्मद उजडाक येतलो
पायलीभर भात आणि नाल दी रे

गणेश हाडताना पेढीक रंगवौन
येताना हुंदीर बरो बघून हाड रे

आवशीक खावं व्हरान इसारलंय
सकळ गंप्या भटाक धरून हाड रे

झिला बेगीन बेगीन कर रे
फाल्या गणपती येतलो रे

***

# शिक्षक दिन

शिक्षक शिक्षक कुठे असतो
रोज कोणीतरी शिकवतच असतो

प्रत्त्येक क्षण शिकवत असतो
जन्मलेला शिकत मरत असतो

पाने फुले वारा खूप शिकवतो
बघणाऱ्यास निसर्ग रोज शिकवतो

जन्मदाता आपला आद्यगुरू असतो
गुरुजन हिऱ्याला योग्य पैलू पाडतो

भाऊ-बहीण, मित्र-मैत्रीण
सहवास बरच शिकवतो

गायन वाचन हे देखील शिकवतात
संत वायय जगण्याचं बळ देतात

सुखा बरोबर दुःखं बरच शिकवत
बरेवाईट अनुभव खरे गुरु असतात

कोण दृश्य तर कोण अदृश्य
सारे माझे शिक्षक असतात

कोण कोणाला शिकवत नसतो
आपणच आपलं शिकत असतो

***

# मन विकारी

उघडी पडती रस्त्यावर अन
अवघडतात मने विलक्षण

विचित्र विकारी विचारांनीं
नयन विसरती इथे उपोषण

सभ्यपण्याच्या कपड्यांखाली
नागडी सोज्वळ दिखावू धुंद

कशी दडेल ती लेंगिक झिंग
विखारी त्या नजरेत दिसे अंतरंग

कितीही कठोर कायदे कानून
विकृत पंखांना कसे लावावे बंध

उघडी पडती रस्त्यावर अन
अवघडतात मने विलक्षण

***

# स्मृती

स्मृतीची चाळता पाने
नखशिखांत मोहरली काया

बालपणीच्या निरागसतेला
मायलोचनी बरसली माया

यौवनाच्या चाहुलीला
प्रेमसहवासाची मोहमाया

संसाराच्या आरंभाला
व्यवहाराने व्यापली छाया

अध्यात्मिक जगतात
चाले चंद्रभागा तीर पाया

वार्धक्यातल्या विस्मृतीला
सापडेना स्वतःचीच परछाया

विविधांगी या सुखदुःखात
साधली जगण्याची किमया

स्मृतीची चाळता पाने
नखशिखांत मोहरली काया

***

# निराशा

निराशेच्या डोहामध्ये
नको खोल खोल जाऊ

काळ्याकुट्ट सावल्यांचा
नको अंधारात वेध घेऊ

संभ्रमाच्या गाभाऱ्यात
नको एकट्याने राहू

घोर व्यथेवीण परतणे
जमेल का कोणास ठाऊ

सत्याचा कडू घोट घेता
आशेच्या किरणांना पाहू

निराशेच्या डोहामध्ये
नको खोल खोल जाऊ

***

# आक्रोश

थांबलो रस्त्यातल्या सिग्नलपाशी
भीक मागणाऱ्या जीवांपाशी

विकत स्वतंत्र भारताचा तिरंगा
कमरेवर शेम्बड्या पोराचा दंगा

अन्न कपड्यांचे सुद्धा भान नाही
ज्ञान मान कधी पहिलेच नाही

गालावर सुकलेले खारे पाणी
पिऊन सारे कसे जगेल कोणी

केविलवाणा मुका आक्रोश
घशाला लागला कोरडा शोष

पाहून त्यांचे जिणे भकास
छातीत अडकला अर्धा श्वास

पाहता जगण्याचा दुबळा प्रयास
अर्ध्यारात्री होतील त्याचे अटळ भास

बघता क्षणिक सिग्नल संपला
समृद्धीचा आभास गुदमरला

गाड्यांच्या थव्यातून मीही निसटलो
थंड एसीत थिजून दगड होत निघालो

***

# वात्सल्य

परदेशातले पक्षी अचानक घरटी परतले
हळुवार त्या बिलगण्याने अंतरंग गहिवरले

वयपरत्वे मन जड वार्धक्याने वाकले
विस्मृतीत रक्ताचे नाते कसे विसरले

क्षणभर क्षीण दृष्टीस नाही दिसले
कापऱ्या स्पर्शास नाही काही उमजले

उबदार सान्निध्यात हरवलेले रंग खुलले
व्रतस्थ आसुसलेले तनमन सुखावले

भिंतीवरल्या फोटोत दोन डोळे ओथंबले
दुखावलेले मायचे काळीज पाझरले

आक्रन्दलेले मन हृदयात कासावीस झाले
लोचनीचे निद्रिस्त काजवे गाली ओघळले

मांडीवर दोन चिमुकले हलकेच विसावले
हळुवार त्या बिलगण्याने अंतरंग गहिवरले

***

# काव्य निर्मिती

काव्यातून अलगद रिते होतात
मनात कोंडलेले विचारांचे बांध

कधी
पेटलेला अवकाळी पर्जन्य!
कधी
हिमगार उमटणारा मृदगंध!
कधी
रातराणीचा विस्मयी सुगंध!
कधी
वर्तमानकाळात धावणारे कबंध!
कधी
पटलेले अध्यात्मिक निर्बंध!
कधी
एकलकोंडा निराश समंध!
कधी
परस्परांचे मानवी संबंध!

असेच सुचतात कधी कधी
बिन व्याकरणाचे निबंध!
कोण शोधी
त्यात काव्यगंध!
कोण म्हणे केवळ
शाब्दिक निरर्थक प्रबंध!

***

# दुबई बेलग्रेड विमानप्रवास

ऐन उन्ह्याळ्यात अर्ध्या दुपारी
दुबई बेलग्रेड निघाली विमानस्वारी

निरभ्र निळे आभाळ छतावरी
शुभ्र ढगांचे थवे वाहती मध्यावरी

वळणे घेत नदी एखादी दिसे दुरवरी
तुरळक कुठेतरी वस्ती नदीकिनारी

दूर दूर त्या क्षितिजावरी
रुक्ष सूक्ष डोंगर कपारी

हिरवे नामोनिशाण नसे कुठवरी
खरी वाळवंटातील रखरखीत सफारी

आठवण आली घरची भारी
आल्हाददायी किती कोकणातील सवारी

***

# बेलग्रेड युवती

नाकी डोळी त्यांची सुबक छान
सात फूट उंची हे देवाचे वरदान

नितळ पोत आणि रंग गोरापान
बोलण्यात नम्र जरी सुंदरी छान

चालण्यात मनोहर लयीचे ठेवती भान
कमनीय बांध्यात वेळावती नाजूक मान

कुटुंब व्यवस्थेला तिथे भारी सन्मान
पाहुण्यांच्या सरबराईत होती रममाण

टर्किश रशियन युरोपिअन मिश्र परिधान
सामाजिक शिस्तीचे जागोजागी अवधान

***

# व्यथा

पुष्पक विमानात गेला माझा तुका
भाविकांना त्याच्या भंडावती रोज भुका

देवतांनो आता का तुमचा फोटो मुका
आसवांचा घास भिजला अर्धाच सुका

कितीही झाल्या अक्षम्य जरी चुका
सत्य त्याचे जिथे वसती सत्तेच्या बंदुका

दररोज जगू ही व्यवहारी मालिका
सोयीनुसार बदलू पूजेच्या पादुका

***

# भोग

कधीतरी काहीतरी बोलायचे
उगीचच अधिमधि हसायचे

दिवस कसेबसे काढायचे
तेच तेच चेहरे जमवायचे

सतत कुढत जगायचे
आत भिजत धुमसायचे

अटळ आयुष्य रडत टाळायचे
रिक्त मनातून भोग भोगायचे

***

# सरण

स्मशानात रचतो सरण
येऊन भुकेला शरण

रोजचे हे वेदना मरणं
मूक यातनेचं जळणं

नको हे सरणावरच जगणं
हे तर जळल्याविना मरणं

रोजच दुःखाचं जगणं
रोजचं अमुच रडगाणं

जगणं अथवा मरणं
त्यातच आता रमणं

***

# स्मृतीभंश

श्वास घेऊ आता हे राहिलेले किती
जीवनाचा हा आभास अजुनी किती

लुकलुकणारे तारेही खिन्न होती रात्री
चांदणेही आता भासे उदास किती

विचारांना सापडेना दिशा कशीबशी
शब्दांचा गोंगाट फक्त अवतीभवती

जरी ओळखीचा सुवास पसरती
ओळख पटेना कोणाची सभोवती

विस्मृतीत जगणे आले नशिबी
आठवणींचा कयास करू किती

प्रेम आशा विरंगुळा जरी संगती
जपावे अजुनी मी भास किती

सतत तुमची छाया माझ्यावरती
तरी परावलंबी हा प्रवास किती

***

# नवपिढी

उद्दाम नवविचारांत
नम्रतेला मान नाही

अनुभवी वयाला
मानाचे स्थान नाही

उधळपट्टीच्या युगात
संचयाचे भान नाही

अल्प संतुष्ट दुनियेत
कष्टाला काम नाही

तंत्रयंत्राच्या या युगात
घामाला सन्मान नाही

सुखाच्या पाठलागात
आनंदाला दाम नाही

***

# दोघे

एकमेकांचे पुसण्या आसू
शेवटी दोघे एकटेच असू

पुसट धूसर नजरेत
एकमेकांस शोधू

दुखणाऱ्या गुडघ्यांनी
एकमेकांची काठी बनू

विसरणाऱ्या क्षणात
गतस्मृती जोपासू

चिडलो रागावलो तर
एकमेकांची समजूत काढू

झोप नाही आली रात्री
तर गप्पा मारत जागू

विस्कटलेली जरी
चौकड हक्काची जपू

एकमेकांचे पुसण्या आसू
शेवटी दोघे एकटेच असू

***

# पैलतीर

दाटला कंठ पाहता
भविष्यातला एकांत

शोधतो खोलवर आत
रमण्याचा सुखी प्रांत

उजळल्या गत स्मृती
भावना होत विक्लान्त

कोलाहल जरी सभोवती
जळते एकटेपणाची खंत

विस्मृतीच्या देणगीने
वृद्धत्व खरे निश्चिन्त

जगताना मोजले
पाप पुण्याचे संचित

सूर्यास्ताच्या संधीप्रकाशी
दिसतो काळोखी अंत

दिसू लागे पैलतीर
कधी होईन मी मुक्त

***

# प्रीत

उधळल्या स्वैर तुझ्या बटा
धुंदले तनमन पिऊन वारा

भुरभुरत्या स्पर्शाने त्या
सुखावला तप्त किनारा

अलगद उडणाऱ्या पदराने
सावरला अंगीचा फुलोरा

लाडिक गोड शब्दांनी
फुलला मनी शहारा

शुभ्र वाळूत कोरड्या
रेखाटला स्वप्न मनोरा

डोळ्यातली प्रीत तुझी
जन्मोजन्मीचा सहारा

धुंद या क्षणांत जपले
आठवणींचा हा पसारा

***

# मी माझे

आत्मप्रौढीने गाठला उच्चांक
आत्मसंतुलनाचा हा नीचांक

'मी माझे 'जपता संपते जीवन
कधी न मिळे आनंदी पूर्णांक

विश्वात तुझे क्षणिक अस्तित्व
स्वीकारण्यास का तू आशंक

भौतिक सुखाला नसे कधी अंत
किती रमशील मोजण्यात अंक

ठेऊन सारे जाऊ परतीस रिक्त
सत्यास या नसे कोणी साशंक

ठेविले अनंते तैसेचि सुखी रहावे
कशाला आकांक्षांचा अपूर्णांक

***

# जवान

सीमेवर राखणार्यांनो
आली दिवाळी आमची

दिवे जाळून रक्ताचे
करा आम्हास आनंदी

कसा घ्यावा विसावा
घरातल्या चिमुकल्यानि

तुझ्याही डोळ्यात असे
स्वप्नचे घर चीरेबंदी

हातात घेऊनी शीर
तू देश राखतो आहे

मला भंडावते आहे
माझी तेजी तुझी मंदी

पोवाडे गातो मी
माझ्याच यशाचे

बर्फात गोठली तुझी
वसंतातील रजामंदी

मंदीर मशीदीत रमलो
आम्ही हे धर्मवेडे

जिथे ठेवता देह
तीच तुमची आळंदी

***

# लिलाव

कधी मांडला लिलाव मीच माझा
विकलो या रंगीबेरंगी बाजारात
कधी माझे मलाच कळले नाही

वरवर दिसले फुलांचे सुगंधी हारतुरे
बोचणाऱ्या काट्यात एकटाच रडलो
कधी माझे मलाच कळले नाही

दररोज छापली आदर्शवादी कविता
जगण्यातल्या अक्षम्य चुका
कधी माझे मलाच कळले नाही

गायले आत्मस्तुतीचे सात्विक पोवाडे
मीच केलेले छोटेमोठे अपराध
कधी माझे मलाच कळले नाही

ओळखीच्या गराड्यात धुंद मी रमलो
वेदनेतला अनोळखी एकटा एकांत
कधी माझे मलाच कळले नाही

नागडा होऊन पाहतो माझ्याच आरश्यात
बेगड्या लक्तरांची असंख्य ओझी
कधी माझे मलाच कळले नाही

***

# त्यांना सांगायचंय

जितकं अधिक मागत जाईल
तितकं अधिक मुकत जाईल

जितकं खोलवर शोध घ्याल
तितकं अधिक हुकत जाईल

मुलांशी त्यांच्या कलाने बोलू लागाल
प्रेमाने त्यांचे आयुष्य फुलत जाईल

आपल्या अपेक्षा घट्ट धरून ठेवाल
त्यांच्या हुषारीच गणित चुकत जाईल

जड साखळदंड कदाचित विजय देईल
पण रक्ताचं कोवळं फुल सुकत जाईल

पालकांशी विश्वासच नातं खुंटलं
असुरक्षितता व्यसनांकडे झुकत जाईल

त्यांना जे सांगायचंय ते ऐकावेच लागेल
नाहीतर जिव्हाळ्याचं नातं थकत जाईल

***

# स्वप्नांचा इमला

जीव माझा दंगला
जीव माझा भंगला

अकाली तुटला
स्वप्नांचा इमला

रोज इथे पाहिला
सामना रंगलेला

निराश जाहला
श्वास वीटलेला

रोखून धरला
प्रेमाचा अबोला

नात्यात संपला
विश्वास हरलेला

आरशात दिसला
जीव कोमेजला

दमून संपला
पहारा विझलेला

***

# दगाबाज

झिंगलो दंगलो मी का कशाला
जगण्याचा पितोय मी रिक्त प्याला

फुलातील सुगंध घेऊन तो दूर गेला
वेचल्या मी तर विझलेल्या ज्वाला

हे कसले सूर तुझ्या सहवेदनेचे
हा तर दगाबाज तुझा बोलबाला

कसे सावरू गोठलेल्या या आसवांना
तुझ्या स्पर्शाविना त्यांचा अर्थ लोपला

अंधाऱ्या काळोखात जागली रात्र सारी
अमावास्येचा चंद्रदेखील अस्ताला गेला

***

# शुभ दीपावली

नरकासुराच्या रात्रीला
दुष्ट सारे नष्ट करूनी
जाग येऊन दृष्टीला
वाढवू श्रुष्टीतला प्रेमधागा

दिवाळीच्या अभ्यंगाला
लुप्त होई काळोख सारा
ज्ञानविज्ञानाची ज्योत पसरो
अंधाराने व्यापलेल्या या जगा

पाडव्याच्या शुभदिनाला
पतिपत्नीच्या अतूट बंधातला
गोड हा सरबराईचा सोहळा
औक्षणाला या जन्मभर जागा

भाऊबीजेला व्यक्त होतो
बहीणभावांच्या नात्याचा गोडवा
आनंदाच्या प्रेमळ भेटीगाठींनी
घट्ट करू राखीबंधनाचा हा धागा

दिव्यां कंदिलांच्या रोषणाईत
दीपांनी उजळला आसमंत सारा
रंग रांगोळीची उधळण करूनी
आनंदाचा संदेश देऊ सर्वजगा

***

# स्वरूपदर्शन

अर्पिले तन
लोपले मन

साधनेचे साधन
रामकृष्ण कीर्तन

ज्ञानेश्वरी ज्ञान
उचित अनुवादन

नित्यानंदी ध्यान
पाहुन हरपले भान

सुखावले लोचन
सकल परिधान

दिसे स्वरुपध्यान
तेच आत्मसमाधान

नित्य ओंकार गुंजन
समाधी गुफास्थान

पावले अंतर्धान
सगुण अवधान

पावस स्थान
आनंदी नंदनवन

ओढ लागे रात्रंदिन
स्वरूपानंद दर्शन

***

# मैफिल

मनातल्या भावनांना
श्रुतींनी साद दिली

रागधारीने साथ दिली
रसिकांनी दाद दीली

तबल्याच्या झंकाराने
सुरांना नाद दिला

पैंजणांच्या घुंघुरांनी
लालित्याला लय दिली

भर दुपारी भैरवी
अपवादाने गायली

तानपुऱ्याची जीर्ण
तार नकळत भंगली

मैफिल अकाली संपली
अनवटी सूर निखळला

***

# कोकणची राणी

चालली धुंदीत गात तराणी
कोकणची ही लाडकी राणी

मधू दंडवतेंची कर्तृत्व वाणी
आम्ही ऋणी त्यांच्या चरणी

अपार इच्छाशक्तीची कहाणी
तांबड्या मातीची ही जीवनगाणी

दिसे छान भातशेतीची लावणी
पुलाखालून खळाळणारे पाणी

बोगद्यातुन गाती धडधड गाणी
सभोवती लाल कौलारु निशाणी

सारे बोलती मधुर मालवणी वाणी
कोंबडीवड्या सोबत आंबोळी चटणी

जरी बेरकी तरी साधीभोळी राहणी
कोकण रेल्वेने बदलली जीवनकहाणी

***

# धागे

सुचते जे मनामध्ये बोलून ते दावू नको
सुखाच्या घडीला निराशेचा सूर लावू नको

प्रेमाची अधीरता नेत्रींचं तुझ्या मुग्ध राहू दे
मूकपणे फुलणाऱ्यास फुलवून झूलवू नको

शब्दांमधल्या जागांतील अर्थ तू सांगू नको
अव्यक्त भावनांना शब्दबंधनात बांधू नको

सहवासात तुझ्या मनी भावविश्व उमलते
या तृप्त समाधीतून जाग आता आणू नको

नको नको म्हणताना गुंतलो तुझ्यात मी
गुंफलेल्या धाग्यांना तू आता सोडवू नको

***

# कोश

’मी माझा ’च्या कोशात
कधीपर्यंत मी राहू

इतरांच्या वेदनांची
सीमा मी नको का पाहू

माझ्याचं सुखाचे मी
किती म्हणून गीतं गाऊ

निजदुःखांची संवेदना
जाणिवेने नको का वाहू

हास्यामागचा विषाद
सशक्त मनी कसा सावरू

आसुत लपलेले हसू
हृदयातुन कसे डोकावू

सहवेदनेची ग्वाही
नको का आपण देऊ

***

# कालचक्र

हलकेच पाऊल उमटत गेले
सुवास दरवळत दूरदूर गेले

आधीचे पाऊल पुसले गेले
मातीच्याच पुरात वाहून गेले

जसे आले तसेच निमूट गेले
रहाटगाडे गतीत फिरत राहिले

नसतेच तसे इथे काहीच आपुले
राहता राहते केवळ नाव जपलेले

बरेवाईट सारेच विस्मृतीत गेले
नवं चैतन्याने जग पुन्हा व्यापले

***

# सांज

वेळ थोडा राहिला
सूर सारे संपले

अजूनही उत्कट नाते
मी शोधतोय आपले

सहवास आहे तरीही
का हे श्वास बरे दाटले

भावनेच्या पुरात कधी
रुक्ष व्यवहाराने गाठले

ओसरणाऱ्या सांजेला
रंगीबेरंगी अर्थ माझे लोपले

रात्रीच्या एकलेपणात
रिक्त काळोखाने व्यापले

***

# ध्यास

गुंतलेला तुझ्या श्वासात
माझाही श्वास आहे

नात्याचा नसला तरी
प्रीतीचा रहीवास आहे

सहवासाची गंधित
दरवळ आसपास आहे

व्यतीत सोनेरी क्षणांचा
हवाहवासा निवास आहे

गोठलेल्या आसवांनाही
फुलांचा सुवास आहे

अधिरतेचा हा असा
न संपणारा प्रवास आहे

प्राक्तनावर नसला तरी
पुनर्जन्मावर विश्वास आहे

जन्मोजन्मी हे ऋणानुबंध राहो
हाच आता जीवन ध्यास आहे

***

# शब्द

शब्द होतात निशब्द
मनाच्या गाभाऱ्यात

निद्रिस्त मूक कवाडात
वेढलेली एकाकी बेटे

शब्दांनी भिडतो आपण
आपल्यातल्या द्वंदाला

शब्द भेटतीलच असे नाही
शब्द पेटतीलच असे नाही

कधी भेटतात शब्दांच्या कविता
कधी पेटतात रक्तबंबाळ संहिता

***

# विस्मृती

अर्थशून्य या पावसात
काळोखाच्या प्रलयात
विसरते मी माझ्याच
घराकडे जाणारी वाट

भासतो जसा उसळतोय
अनोळखी पूर अनावर
हेलकावणाऱ्या अफाट
दिशाहीन गलबतासारखा

आयुष्यातील सुसंगतीच
चाललीय स्वैर दिशांनी
आरशात मी शोधते
स्वतःचेच जाणते रुप

चाचपते स्मरणात
जपलेली नातीगोती
थंड आगपेटीसारख्या
भिजून विझतात स्मृती

सावरते कशीबशी
हा थकलेला श्वास
अर्थशून्य या पावसात
काळोखाच्या प्रलयात

***

# प्रतिमा

मी उभी केली माझीच प्रतिमा
या विकाऊ भरलेल्या बाजारात

वाखाणून त्याची यशोगाथा
सजविली तीस नखशिखांत

नावाजलो जनमानसात म्हणे
निर्भीड कर्तृत्ववान थोर महंत

गर्द लांब त्याच्या छायेखाली
मीच केला जीवनमूल्यांचा अंत

या बेगडी महतीने थकलो
भेदरलो मी निराश क्लांत

उद्विग्न बसलो पायांशी शांत
गाठण्यास माझा एकटा एकांत

***

# ओढ

नेत्रपल्लवी तुझी
देती मला सलामी

नखऱ्यात तुझ्या गुंतलो
चित्त न लागे कामी

बोलणे तुझे लाघवी
कावा मात्र गनिमी

स्पर्शातल्या मृदलतेने
फुलवी अंग रोमरोमी

जखमी करून हृदया
हसती तू वरून नामी

मोहक त्या संकेतांनी
झालो मी पुरता निकामी

दिवसरात्री उफाळती
प्रेमलहरींची सुनामी

जरी हुरहूर वाटे मनास
चालेल मला ही गुलामी

***

# प्रीत

मखमली शेजावर तुझे
रेशमी यौवन उलगडले

सैल केशबंधातुन तुझ्या
सुगंधी पुष्पगंध परीमळले

मुद्रेतल्या तुझ्या दर्पणात
प्रीतीचे स्निग्ध अंकुर खुलले

अंतरीचे कूजन अलगद
हलकेच मनी कुजबुजले

झोपाळल्या नजरेत त्या
चांदणे उन्मादक फुलले

श्वासातले मोहक सूर
लयीत लहरू लागले

ओठावरचे गीत तुझ्या
असंख्य वीणांनी छेडले

धुंद रंगलेल्या या रात्री
मनात निशिगंध मोहरले

वास्तव की स्वप्न हे मात्र
अबोध मनास न कळले

***

# संगत

जवळी असता तू
मनी येते विरक्ती

डोळ्याआड होता तू
ओढते गुढ आसक्ती

अलिप्त होता दाटते
मनोमनीची भक्ती

तुझ्याविना सापडेना
जगण्याची काही युक्ती

तुझ्या संगे जगण्यात
निराशा पावते मुक्ती

***

# त्याग

पानाफुलांचा रंगीबेरंगी पिसारा सावरत
मुळे घेतात गाडून स्वतःस खोल खोल

अंधारातले जगणे जरी अदृश्य अटळ
जगवण्यासाठी शोषतात मिळेल ती ओल

बहरण्यास अपुल्या नाजूक या जीवास
स्वसर्वस्वाचा निस्वार्थी त्याग अनमोल

खाद्यपाणी देऊन शिकवते किरणांचे मोल
बनवती झेलण्या वाऱ्यावादळास खुशाल

फुलाफळांनी सुखावले आकाशी झेपावले
जमिनीखाली घट्ट रोवून ठेवते नाते अटल

झाड मोहरते डवरते फुलते झडते पडते
मूळच देते पुन्हा नव्याने जगण्याचे बल

***

# चराचर

अवतीभोवती तुझाच श्वास आहे
गुलाबी थंडीसही तोच सुवास आहे

कोण म्हणे देव तो नभापलीकडे आहे
खरतरं निसर्गातच तो आसपास आहे

उखडून फ़ेकले मला नास्तिकास जरी
उरात माझ्या अजून तुझाच निवास आहे

दिसशील कधी तर लपशील कधी तू
अनंत रूपे पाहण्याचा हा प्रयास आहे

चराचरास दिल्या तू साऱ्या आनंदमुद्रा
अनुभवण्या हा शाश्वताचा प्रवास आहे

***

# माझी कविता

माझी संहीता मी आपली लिहीत राहिलो
'वेड लागलं बहुतेक 'सारे म्हणत राहिले

कुणीही सहज डोकावून आत शिरेल
असा काव्यकोश मी गुंफत राहिलो

ऋतू इथले वेगळे, बहर ही आगळा
ऊर्जेत इथल्या मी भिनत राहिलो

शब्दांच्या गर्दीतून भावना चोरतांना
भिन्न वाटांवर मी भटकत राहिलो

कित्येक वर्षांचा ढीग साठलेला इथे
मातीतून त्या स्वतःला उपसत राहिलो

तुंबले आत अखंड आयुष्यातले संभ्रम
मोकळा होऊन ओसंडून वाहू लागलो

***

# रहाटगाडे

रोजचे तेच रहाटगाडे
विखुरले स्वप्न चहूकडे

तेच गाणे अन तेच तराणे
तेच मूर्ख अन तेच शहाणे

शिळे काव्य अन बुळे विनोद
जुन्या कथा अन भ्रष्ट बोध

पुनः पुन्हा तेच तेच भोग
आसक्तीचा तोच तोच रोग

तेच ओठ अन तेच डोळे
शृंगारातले तेच तेच चाळे

कुरूप असो वा स्वरूप नारी
न्यारी प्यारी तरी एकतारी

तेच गाभारे अन त्याच मूर्ती
तीथे मिळते तीच तीच स्फूर्ती

रटाळ आयुष्यात झालो बेजार
सुख थोडे अन दुःखच फार

***

# जनता

जनतेच्या मनात
अन्यायाची कळ आहे
जनतेच्या मनगटात
शिवरायांचे बळ आहे

जनतेच्या पोटात
भुकेची आग आहे
जनतेच्या डोक्यात
प्रतारणेचा राग आहे

जनतेच्या उद्रेकात
ज्वालामुखीची लाट आहे
जनतेच्या कल्याणात
भविष्याची पहाट आहे

जनतेच्या विखारात
तापलेले रक्त आहे
जनतेच्या मतांत
सत्तेचं तख्त आहे

जनतेच्या उद्धाराकरीता
अजून एक समर आहे
जनता अखंड असेल
तरच लोकशाही अमर आहे

***

# आठवणी

’गेले ते दीन ’म्हणत म्हणत
गतस्मृतींना आज आठवले

नव्या नवलाईतल्या दिवसांत
स्वप्न अंतरीचे चांगलेच नटवले

असमंजस क्षणिक वाद वितंडात
व्यर्थ अहंकाराने स्वतःस पेटवले

त्या अनाठायी त्रासलेल्या क्षणी
अजाणतेपणी तिला दुखावले

ओसंडणारे भावनांचे अश्रू
निष्ठुर डोळ्यात उगीचच साठवले

अस्पष्ट धूसर संधीप्रकाशात
कुणीतरी दुरून अलगद दटावले

मागे आवेगाने वळून पाहतो तर
हातात हात मीच माझे गाठवले

सांजवेळी रुध्द मनास कळेना
काय कमावले काय गमावले

***

# संस्कार

आपल्या नात्यात दडलेत
किती विविधांगी आकार

कधीकधी उफाळून येतात
दबा धरून बसलेले विकार

उजळलेल्या लख्ख वाटेवरचे
अल्पशे अहंकारी चढउतार

इर्षेच्या त्या अवघड क्षणी
लोपतात सारासार विचार

अखेर या निरर्थक द्वंदात
भावना होतात पायउतार

सरतेशेवटी एकत्र आणतात
प्रेम जिव्हाळयाचे संस्कार

***

# आकांक्षा

कशाला बेगडी नात्यांची व्यर्थ अवडंबरे
गरीब श्रीमंत सारी या धर्तीचीच लेकरे

मी माझेची अवाजवी धुंदी कधी ओसरे
जीवन जगता जगता उमजले आता सारे

ओसरली उन्हे आणि उब ओळखीचि विसरे
भोवताली घोंघावती चक्र विचारांचे वारे

रस्त्यारस्त्यावर टांगली वासनेची लक्तरे
सत्या असत्याचा मागमूसही आता ना उरे

रिक्त आकाशात चमकती चांद सितारे
जीर्ण खोडासही फुटती आशेचे धुमारे

कधीतरी छेडणार का आता एकसुरी तंबोरे
आनंदाचे गीत गाण्यास सज्ज होऊ सारे

***

# ‘ती’ ...आली

तप्त प्रतीक्षेनंतर हळुवारपणे ती आली
पहाट उघडता अभ्र वितळत ती आली

रंगीबेरंगी पाखरांना संगे घेऊन उगवली
किरणांचा गुलाल उधळीत ती अवतरली

मखमली दवबिंदूंत नखशीखांत ती नहाली
धुक्याचे तलम शुभ्र वस्त्र लेवून ती पधारली

बंद शयनघरात उबदारपणे ती सुखावली
बोचऱ्या मोहक मृदू स्पर्शाने ती शहारली

अलगद पावलांनी कुशीत ती स्थिरावली
गुलाबी गोड मिठीत हलकेच ती विसावली

मुखबंद ओठात धुंदलेली स्वप्ने विरली
निःस्तब्ध सहवासात सारी गात्रे थरारली

मिलनाच्या स्वर्गसुखात मुक्त ती हरवली
निरवतेच्या गुप्त समेवर अन घंटा निनादली

उशिराने का होईना सालाबादी ती आली
ती गुलाबी थंडी गार गारवा घेऊन आली

***

# नटसम्राट

चैतन्यहीन नाटके करून फार गेले
पडसाद ठेवून मागे मोजकेच गेले

भूमिकेत कोरड्या न्हाऊन फार गेले
रंगमंचावर जगणारे मोजकेच गेले

नाट्यातले संवाद फेकून फार गेले
शब्दातला आशय देऊन थोडेच गेले

नाटकाने समृद्ध जीवन जगून फार गेले
नाटकासाठीच जगून फार थोडेच गेले

जरी डॉ श्रीराम लागू आज दूर गेले
त्यांचा नटसम्राट मनात कोरून गेले

***

# परतीची वाट

झेपाव तू अवकाशात
मातीत झोपडे मी बांधते
मडक्यातुनी मातीच्या
आठवणीत मी रांधते

सहवासावाचून हेलावते
गर्द आभाळ आसवांचे
श्वासांचा तुझा दुरावा
काव्यातुनी मी सांधते

घे निश्चिन्त गगनभरारी
उंच उंच क्षितिजावरी
कोंडलेल्या चार भिंतीत
संसार मी माझा मांडते

उजेडाची वाट शोधत
जा सूर्याकडे असाच तू
अधांतरी कंदिल पाहत
काळोखात मी नांदते

असहाय झाले तरीही
साचलेल्या वेदनेला
उरात गच्च कवटाळून
परतीची वाट मी पाहते

***

# संभ्रम

ओठात असेल बासरी
नजर फिरती त्यावरी
जो राग नाही आपला
तो सूर तू लावू नको

व्यक्ती तिथे भक्ती
पाषाण तिथे देव
श्रद्धा नाही आपली
तिथे मस्तक तू टेकू नको

जिथे असे सुख
तिथे येई दुःख
व्यर्थ त्या संभ्रमात
उगी तू हेलाऊ नको

कधीतरी येणार
पाप पुण्यांचा पूर
सत्य शोधण्या त्यात
उगीचच तू वाहू नको

***

# माझा चंद्र

माझा आपलाच चंद्र
अन चिमूटभर चांदणे
जपले मी माझ्याच
बंदिस्त आभाळात

रमलो चांदण्याच्या
शीतल प्रकाशात
अपूर्वाई त्याची
माझ्याच पोराबाळांस

काळवंडला चंद्र
निसटले चांदणे
ढगाळले आभाळ
अन दाटला काळोख

थरथरत्या हातांतून
ओघळले चांदणे
अन आसवांत शोधतो
मी माझाच तो चंद्र

***

# खोटे

खोटेच हसणे
खोटेच रडणे
खोटी संभाषणे
खोट्यांसंगे इथे
खोटेच जगणे

खरे मंत्रीपद
खरे बंगले
खरे लवाजमे
सत्तेच्या धुंदीत
गुलाबी भांडणे

हेच देशाचे सर्वज्ञ
हेच ठरवती पूर्वदिशा
हेच करती व्याख्या
आपसात खाती
सत्तेची कुंपणे

कधी धार्मिक
कधी निधर्मिक
कधी देशभक्त
सत्तेसाठी युती
एकत्र भुंकणे

त्यांचेच सत्य
त्यांचेच असत्य
त्यांचीच क्रांती
फुटती आमची कपाळे
त्यांचे चिथावणे

***

# दावा

कीती करायचा गोड बोलायचा दावा
कशाला उगीचच हा बेगडी देखावा

भावनेत गुंफलेला रोजचा कवितेचा चाळा
कशासाठी हा शब्दांचा अर्थहीन मेळावा

पाहता तुझे रोजचे कोरडे फसवे हसू
आसवातला माझ्या संपला ओलावा

उमटली अक्षरातून तुझी मूक वेदना
पाझरला हुंदक्यातून तुझा कांगावा

सारा जन्म जरी आपुला वादळी गेला
आता सोसवेना हा अखेरचा सांगावा

***

# काळोख

ओशाळला चंद्र माझा
काजव्यांचा हा पसारा

काळोखलेल्या रात्री कुठे
दिसेना लुकलुकता तारा

चमचमत्या या दुनियेत
दुरावला मायेचा किनारा

फुललेल्या वसंत रात्री
सापडेना सुगंधी सहारा

कुठे कुठे आता ठेवू
सजग जागता पहारा

ओशाळला चंद्र माझा
काजव्यांचा हा पसारा

***

# आलेख

वर्षामागून वर्ष सरले
सुखदुःख एकमेका गुंफले

हिशेबाचे देत दाखले
आलेख केवळ आखले

काही नवे सूर जुळले
जुळलेले काही विस्कटले

कधी वसंतऋतू फुलले
कधी पानगळीने गाठले

नात्यातले नाते विरले
अनोळखी नाते बांधले

नवस्वप्नांचे उमंग भरले
स्वप्नभंगाने कधी वेढले

किती काय जगले
किती जगायचे उरले

कधी स्वीकारले
कधी नाकारले

दुख्खाचे आचमन केले
सुखात ओलेचिंब भिजले

वर्षामागून वर्ष सरले
सुखदुःख एकमेका गुंफले

***

# क्रांती

अंतरात अमुच्या पेटला विस्तव
पाहता सभोवती दारुण वास्तव

विस्तव आतल्याआत धुमसतोय
मोकळा श्वास धुरात घुसमटतोय

कोंडलेला क्रांतीचा मनी अंतर्भाव
वर सुसंस्कृतपणाचा खोटा डाव

हा सारा दबलेला बेगडी अविर्भाव
संयमाने कसाबसा आवरला भाव

एकदिवस भडकेल आगडोंब
जाळून सुसंस्कृतपणाचा आव

पेटतील तप्त ज्वाला गावोगाव
वास्तवातल्या नरकासुरावर घाव

***

# खांदे

डोक्याला आधार देतात ते खांदे
कुटुंबाचं ओझे पेलतात ते खांदे

झुंडशाहीचा झेंडा घेतात ते खांदे
बंदुकीने शत्रूला टिपतात ते खांदे

सत्तापलटात बदलतात ते खांदे
तत्वे समर्थपणे पेलतात ते खांदे

प्रेमाने डोकं विसावतात ते खांदे
सांत्वनासाठी थोपटतात ते खांदे

अपयशाने खाली पडतात ते खांदे
शाबासकीने फुलतात ते खांदे

मुलाला लाडाने बसवतात ते खांदे
ढसाढसा रडून भिजतात ते खांदे

देवाची पालखी वाहतात ते खांदे
अखेरच्या प्रवासात देतात ते खांदे

***

# माता

अवखळ तू कन्या सगुणी
चंद्रकोरीसम प्रेमळ भगिनी
गंगेसम वात्सल्य जननी
मानवाची सुखसंजीवनी

जरी भोगल्या प्रेमयातना
त्या दारुण प्रसववेदना
यादि देऊन रूपयौवना
सुख पाहता पदरी कान्हा

म्हणून मातेस फुटतो पान्हा
देवही तिचा झाला तान्हा
चिरंजीव तो पिऊनी त्यांना
कृतज्ञ झाला तो मातेचा सदना

तोच पिउनि दरिद्री मानव
कृतघ्नतेने होतो कधी दानव
कितीदा करतो तुझी वंचना
दिल्या तुला अमित यातना

कधी न आटली तुझी करुणा
धावती कळवळुनी अश्रू लोचना
विसरून जरी साऱ्या गतवेदना
हेच मंगलरूप आई तुझे नयना

***

# गर्दी

मुंबईच्या गर्दीत
रेल्वे स्टेशनवर
वाढता पायांचा पूर
त्यात धपापणारे उर
आणी घामाने
निथळणारी शरीरं
बिनचेहऱ्याची
अनोळखी
संवेदनाशून्य
जीवघेणी रेटारेटी
बिनभाषेची गलबल
असंबंध गलका
भगव्या हिरव्या निळ्या
एलईडी प्रकाशात
सहज बदलणारे
निष्प्रभ चेहरे
माणसांच्या पुरात
आकंठ बुडालेला
निर्जीव तरंगणारा
माणूसकीचा भाव
स्वतःचा चेहरा
पार विसरलेला
आयुष्य रेटणारा
रोजच्या चक्रात
लोम्बकरणारा
या अभागी
गर्दीत एकटा
माझाच मी !

***

# मिलन

हृदये अशांत एकाकी दोन
अनोळखी युगात चालत वाट
परस्परांच्या शोधात होती
आजची ही गोड मिलनभेट

संपला एकटेपणा तो आज
होतसे जीवन सफल सांग
संपतो संकोच अन प्रतीक्षा
उजळत हजारो दिव्यांची रांग

निळ्या नभांतून निथळे
स्वर्गीय सुगंधी दवबिंदू एक
रंगीत नवजीवनफुलांची
रेशमी पाकळी उमले प्रत्येक

कालप्रवाह थांबतो आता
तुम्हा दोघांच्या चरणाशी
विसरून विराट प्रपंच सारा
दोघेच उराल या प्रेमविश्वकोषी

***

# अश्रू

दडवायचे दुख्ख असता
नेमके ओघळतात गाली
आसवे किती ही निर्दयी
वाहतात अवेळी खाली

लपवायचा हर्ष होता
आसवांनी उघड केला
ओलावलेल्या कडा
गुपित सांगून गेल्या

सुख दुख्खाचे ओझे
आसवे नेतात वाहून
मनावरचा जड भार
होतो हलका होऊन

खोटें कधीच नव्हते
आसवांचे बोल डोळी
भूतकाळ सारा दिसतो
दाटता डोळ्यात पाणी

***

# दैव

गरिब फाटक्या संसारा
चार झापातल्या निवारा

जीवास नसतो कधी थारा
काळजीची सतत विषधारा

शोधतो कधी सुखाचा वारा
आजन्म दुख्खाचा सारा पसारा

काय सजवेल तिच्या शृंगारा
कुठून घालेल प्रियेस मणिहारा

सापडेना कधीच स्वस्थ किनारा
विसंबूंनी त्या दैवास लावी अंगारा

फाटक्या संसारात जातो आहारा
अखेर सारी मदार विषप्राय मदिरा

***

# जागर

स्त्री शक्ती हीच सहृदयी आदिशक्ती
तिचीच मानवतेवर निःस्सीम भक्ती

तिच्याठायी क्षमाशीलतेची युक्ती
प्रसंगी कठोर शिस्तीची ती भोक्ती

तिच्याकडे आहे सर्वोच्च सहनशक्ती
कस लागतो सांभाळता मुले व पती

समान भागीदारी ही आहे सद्यस्थिती
सक्षम आहे ती करण्या सुदृढ राजनीती

प्रेमाने जग जिंकेल तिची विवेकमती
युद्धखोरीस थोपवेल फक्त स्त्रीशक्ती

पाळण्याची अक्षय दोरी जिच्या हाती
तिच्या नेतृत्वातच दडलीय जगाची प्रगती

***

# मृगजळ

कागदावर मी पाहिले
शब्दांचे आभासी मृगजळ

कागदावरच मी रेखिले
चंद्र-सूर्य अन समुद्रतळ

कागदावर मी जगले
आशे-निराशेचे खेळ

कागदावर मी जागविले
विद्रोहाचे अग्निबळ

कागदावर मी गायले
उदय-अस्ताचे मंडळ

कागदावर मी उतरवले
सत्तापिपासूंवर पोटशूळ

कागदावर कधीतरी वाटले
येईल रक्तात खरी कळ

पण कागदावरच राहिले
संवेदनशील जीवन निष्फळ

***

# रेशीमगाठी

दृढ नाती धुंडाळता भरून आला जीव
शोधताना ओलांडली दुराव्याची शीव

प्रत्येक भेटीत भेटे नवनवीन परिचय
पुन्हा नवीन संशय अन नवनवीन भय

काळोख्या गूढ वाटा विहिरी खोलखोल
पण खोल साठलेली त्यात इवलीशी ओल

उत्कटता ओळखीची जरी शब्दातीत
ओळखीचे सूर पण अनोळखी ते गीत

घट्ट नात्यांच्या अबोध या रेशीमगाठी
कधी कळेना काय पोटी अन काय ओठी

***

# प्राक्तन

किती भावनांच्या हिंदोळ्यावर झुलणे
नकोसे वाटते आता
कोरडया आसूंचे रुसणे

प्रत्येक भेटीत नशिबाचा नवा चेहरा
नकोसे वाटते आता
अदृश्य काजवे वेचणे

अंधार पाऊलवाटा धुंडाळून आलो किती
नकोसे वाटते आता
गर्द काळोखात हरवणे

अजाण पाऊले नेती अज्ञात प्रांतात
नकोसे वाटते आता
अजाण थव्यासंगे उडणे

किती प्राक्तनाशी जुळवून घ्यायचे
नकोसे वाटते आता
नव्याने स्वतःस शोधणे

***

# चाहूल

दुडकत दुडकत लेवून आली
प्रभाती लाली उधळत गाली

शहारून कांती अलगद पसरली
अनावर गारव्यात पहाट विसावली

हिरवीगार धरती शांत निजली
पांघरून दवबिंदूंची ओलं मखमली

खळाळत अवखळ जलपरी उफाळली
धूसर लयदार वळणात हळूच हरवली

सोनेरी किरणांची पाऊले दबकत आली
धुक्याचे तलम वस्त्र फेडित विस्तारली

सुंदरतेवर वाहत या सकाळ उलगडली
स्वप्नवत जगण्याची चाहूल लागली

***